सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०२५ | वर्ष - ३ रे | अंक २४३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तिरंग्याची शान राखणाऱ्या वीरांसाठी महाराष्ट्राची कृतज्ञ भेट

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी सशस्त्र सेना ध्वजदिननिमित्त निधी संकलनाचा केला शुभारंभ

**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे 'सशस्त्र सेना ध्वजदिन-२०२५' निमित्त निधी संकलनाचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी शहीद सैनिकांच्या परिवारातील विविध क्षेत्रांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

भारतीय सेनेचा गौरवशाली इतिहास अधोरेखित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशाच्या सार्वभौमत्त्वाचे रक्षण आणि तिरंग्याची शान कायम राखण्यासाठी भारतीय सैनिकांनी प्रत्येकवेळी आपल्या प्राणांची बाजी लावली. सैनिक देशाचे रक्षण करतात म्हणूनच आपण शांततेत जगू शकतो, प्रगती साधू शकतो आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देऊ शकतो. अलीकडील 'ऑपरेशन सिंदूर'मधून भारतीय सेनेने जगाला आपली सामरिक क्षमता दाखवून दिली असून आज भारताची सेना जगातील शक्तिशाली सैन्यांमध्ये गणली जाते, ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे.

मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितले की, २०१४ मध्ये मुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर शहीद सैनिकांच्या कुटुंबियांसाठी दिली जाणारी मदत ३ लाखांवरून वाढवत २५ लाख करण्यात आली आणि नंतर ती वाढवून १ कोटी करण्यात आली. शहीदांच्या बलिदानाचे मोल पैशांत मोजता येत नसले तरी त्यांच्या कुटुंबियांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक आधार महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी नमूद केले. माजी सैनिक कल्याण विभागामार्फत शहीद सैनिकांच्या कुटुंबियांसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत, हेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी संकलित करण्यात येणारा निधी हा सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उपयोगात येतो. सामान्य माणूस आपल्या व्यवसायातून, वेतनातून किंवा पेन्शनमधून स्वेच्छेने निधी देत आहे, हे नमूद करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आणि भारतीय सेनेबद्दल समाजाच्या मनात असलेल्या श्रद्धेचे व कृतज्ञतेचे द्योतक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पुढेही सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून निधी संकलनाला व्यापक प्रतिसाद देण्याचे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. मागील वर्षी निधी संकलनात महाराष्ट्रातील नागपूर विभागाने प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल विभागीय आयुक्त आणि नागपूर जिल्हाधिकाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. यावेळी मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, सशस्त्र दलाचे सैनिक, शहीद सैनिकांचे कुटुंबीय उपस्थित होते.




**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'सशस्त्र सेना ध्वजदिन - २०२५'निमित्त निधी संकलनाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, भारतीय सशस्त्र दलाचे सैनिक, शहीद सैनिकांचे कुटुंबीय आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## 'वंदे मातरम्'च्या चर्चेदरम्यान पंतप्रधानांचे काँग्रेसवर आरोप



**नवी दिल्ली :** वंदे मातरम् या राष्ट्रगानाला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आज लोकसभेमध्ये चर्चा होत आहे. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाने या चर्चेला सुरुवात झालीय. वंदे मातरम् या राष्ट्रगानाला १५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक क्षणाचे आपण साक्षीदार आहोत, ही गर्वाची बाब आहे. मी सर्वांचे आभार मानतो. या महत्वपूर्ण प्रसंगी सामूहिक चर्चेचा मार्ग निवडला. ज्या मंत्राने, जयघोषाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या आंदोलनाल ऊर्जा, प्रेरणा दिली, त्याग आणि तपस्येचा मार्ग दाखवला, त्या वंदे मातरम् च स्मरण करणं हे आपल्या सर्वांच सौभाग्य आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. वंदे मातरम् चा १५० वर्षांचा प्रवास अनेक टप्प्यांवरुन गेला आहे. वंदे मातरम् ला ५० वर्ष झाली, तेव्हा देश गुलामीमध्ये होता. ज्यावेळी वंदे मातरम् ला १०० वर्ष पूर्ण झाली, तेव्हा आणीबाणी लागलेली. वंदे मातरम् साठी अत्यंत उत्तम पर्व पाहिजे, तेव्हा संविधानाचा गळा घोटलेला असं पीएम मोदी म्हणाले.

पंतप्रधान म्हणाले, आणीबाणीमुळे देशाला बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. मोदी म्हणाले की, ही चर्चा केवळ सभागृहाची वचनबद्धता प्रकट करणार नाही तर जर आपण त्याचा सुज्ञपणे वापर केला तर भावी पिढ्यांसाठी शिक्षण म्हणूनही काम करू शकते. आपण नुकताच आपल्या संविधानाचा गौरवशाली ७५ वा वर्धापन दिन साजरा केला. आज, देश सरदार पटेल आणि बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती देखील साजरी करत आहे. गुरु तेग बहादूर यांचा १५० वा शहीद दिवस. वंदे मातरमचा १५० वर्षांचा प्रवास अनेक टप्पे पार करून गेला आहे. जेव्हा वंदे मातरम पहिले ५० वर्षांचे होते तेव्हा देशाला गुलामगिरीत जगण्यास भाग पाडले गेले होते. जेव्हा वंदे मातरम पहिले १०० वर्षांचे होते तेव्हा देशाला आणीबाणीने बेड्या ठोकल्या होत्या.

## एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलली

**मुंबई :** राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४८ नगरपंचायती निवडणुकीच्या मतमोजणीमुळे २१ डिसेंबर रोजीची एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सर्वच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, नव्याने परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होणार आहे. महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आणि महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अनुक्रमे ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येत आहेत. यासंदर्भातील शुध्दीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे, अशी माहिती आयोगाने दिली. त्यामुळे, परीक्षार्थी, उमेदवारांनी याची दखल घ्यायला हवी.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२५च्या परीक्षेचे आयोजन २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत करण्यात आले होते. तथापि, राज्यातील नगर परिषद व नगर पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका २०२४ कार्यक्रमांतर्गत राज्य निवडणूक आयोगाच्या २ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार

### सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करुन निर्णय

> **४ आणि ११ जानेवारीला होणार परीक्षा**
> आयोगाच्या परपत्रकानुसार, एमपीएससी गट 'ब' संयुक्त सेवा पूर्व परीक्षेची नवी तारीख ४ जानेवारी २०२६ रोजी ठेवण्यात आली आहे. तर, महाराष्ट्र गट 'क' ची संयुक्त सेवा पूर्व परीक्षा ११ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात येणार आहेत.

मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देशित केले आहे. आयोगामार्फत आयोजित परीक्षा व मतमोजणी एकाच दिवशी म्हणजेच २१ डिसेंबर २०२५ रोजी असल्याने त्यासंदर्भात काही मुद्यांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून माहिती मागविण्यात आली होती. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेली माहिती आणि निकालाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपरोक्तप्रमाणे जिल्हाधिकारी यांचेकडून मागविलेल्या माहितीच्या अनुषंगाने, काही जिल्हा केंद्रावरील परीक्षा उपकेंद्र व मतमोजणीचे ठिकाण यामधील कमी अंतर, लाऊडस्पीकरचा आवाज, वाहतूक कोंडी, परीक्षेदरम्यान निघणाऱ्या विजयी उमेदवारांच्या मिरवणुका, तसेच परीक्षेच्या आयोजनाकरीता कर्मचाऱ्यांची कमतरता इत्यादी बाबी विचारात घेवून त्यांनी परीक्षा आयोजित करण्यास अडचणी उद्भवू शकतात असे कळविले आहे.

सदर वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तुत परीक्षा नियोजित तारखेस न घेता पढे ढकलण्याचा आयोगाने निर्णय घेतल्याचे आयोगाने परिपत्रकाद्वारे कळवले आहे.

## ७५ हजार २८६ कोटींच्या पुरवणी मागण्या अधिवेशनात सादर

**नागपूर :** राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अर्थमंत्री अजित पवार यांनी एकूण ७५ हजार २८६ कोटी ३८ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या.

या मागण्यांमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई, कृषिपंप व वस्त्रोद्योग ग्राहकांना विद्युत सवलत, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आदी महत्त्वाच्या बाबींचा समावेश आहे. यापैकी अनिवार्य खर्चासाठी २७ हजार १६७ कोटी ४९ लाख, कार्यक्रमांतर्गत ३८ हजार ५९ कोटी २६ लाख आणि केंद्र पुरस्कृत योजनांसाठी १० हजार ५९ कोटी ६३ लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. मात्र, या स्थूल रकमेचा निव्वळ भार ६४ हजार ६०५ कोटी ४७ लाख इतका असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

राज्यातील विविध विभागांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या या पुरवणी मागण्या मुख्यत्वे आपत्ती व्यवस्थापन, कृषी व ऊर्जा क्षेत्रातील सवलती, महिला सशक्तीकरण, ग्रामीण रोजगार, आरोग्य व नगर विकास यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांना भरीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी आहेत. राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी आणि आपत्ती प्रतिसाद निधीसाठी सर्वाधिक १५ हजार ६४८ कोटी रुपयांची तरतूद आहे. यानंतर कृषिपंप, यंत्रमाग व वस्त्रोद्योग ग्राहकांना विद्युत शुल्क सवलत आणि प्रधानमंत्री कुसुम घटक-ब योजनेंतर्गत लाभार्थ्यांसाठी ९ हजार २५० कोटी रुपयांची व्यवस्था प्रस्तावित आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी ६ हजार १०३ कोटी २० लाख, तर केंद्राकडून भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत ५० वर्ष बिनव्याजी कर्ज म्हणून ४ हजार ४३१ कोटी ७४ लाख रुपयांचा समावेश आहे.

## २५ डिसेंबरपासून मुंबई-नांदेड विमानसेवा




**नांदेड :** नांदेड-मुंबई बहूप्रतिक्षित विमानसेवेचा २५ डिसेंबरपासून शुभारंभ होणार असून, स्टार एअर कंपनीने तिकीट विक्रीही सुरू केली आहे. खा. अशोक चव्हाण यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे यश आहे.

मुंबई-नांदेड-मुंबई ही विमानसेवा तूर्तास मंगळवार, गुरुवार आणि शनिवार असे तीन दिवस उपलब्ध असेल. मात्र, लवकरच ती सेवा दररोज सुरु होणार आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरून दुपारी ४.२५ वाजता विमानाचे उड्डाण होऊन सायंकाळी ५.४० वाजता ते नांदेडच्या श्री गुरु गोबिंदसिंघजी विमानतळावर उतरेल. परतीच्या प्रवासासाठी हे विमान सायंकाळी ६.१० वाजता उड्डाण करून रात्री ७.२५ वाजता मुंबईला पोहोचेल.

ही विमानसेवा १५ नोव्हेंबरपासून नियोजित होते. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे त्यास विलंब झाला. दरम्यानच्या काळात माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी सदरहू तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला. नांदेड - मुंबई विमानसेवेला मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरच स्लॉट मिळावा, यासाठी देखील ते सातत्याने आग्रही राहिले. या विमान सेवेमुळे नांदेड जिल्ह्यासह हिंगोली, परभणी, लातूर, वाशिम, हिंगोली अशा अनेक जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. नांदेडहून मुंबईसाठी थेट विमानसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री के. राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

## सुप्रीम कोर्टानं 'इंडिगो'ला फटकारले

**नवी दिल्ली :** इंडिगो एअरलाईन्सचे प्रकरण सरकारने सांभाळावे, असे कठोर निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. एअरलाईन चालवणे हे न्यायालयाचे काम नाही, असे स्पष्ट शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे.

इंडिगो एअरलाईन्सवर केंद्र सरकारने कारवाई करावी, असेही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या महत्त्वाच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सध्या सुनावणी सुरू असून, न्यायालयाच्या या भूमिकेमुळे केंद्र सरकारवर या प्रकरणी तत्काळ पावले उचलण्याचे बंधन आले आहे. तर इंडिगोच्या विस्कळीत सेवेमुळे देशभरात प्रवाशांना मोठा फटका बसला.

या मनस्तापामुळे गंभीर परिस्थितीवर तात्काळ सुनावणी व्हावी अशी मागणी करणारी याचिका नरेंद्र मिश्रा यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांनी सरकारकडे या अडचणीच्या परिस्थितीत कोणते पर्याय आहेत, अशी विचारणा केली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाकडून समन्स बजावण्याची मागणीही करण्यात आली आहे.




## 'तपोवन' प्रकरणी सयाजी शिंदे राज ठाकरेंच्या भेटीला

**नाशिक :** नाशिकमध्ये होऊ घातलेल्या कुंभमेळ्यासाठी तपोवनातील झाडं तोडण्याच्या मुद्द्यावरुन सध्या राजकीय आणि सामाजिक वातावरण प्रचंड तापले आहे. यामुळे सध्या नाशिकमध्ये मोठे जनआंदोलन उभे राहिले आहे. या वादात अभिनेते आणि सह्याद्री देवराई संघटनेचे सर्वेसर्वा सयाजी शिंदे यांनी उडी घेतली होती. त्यांनी तपोवनाला भेट देऊन वृक्षांची कत्तल करण्यास विरोध गेला होता. मात्र, या सगळ्यानंतरही राज्य सरकार साधूग्राम उभारण्यासाठी तपोवनातील झाडे कापण्याच्या निर्णयावर ठाम आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी सयाजी शिंदे यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली.

सयाजी शिंदे हे सोमवारी सकाळी मनसे चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांच्यासोबत राज ठाकरे यांच्या मुंबईतील शिवतीर्थ या निवासस्थानी आले.



या दोघांमध्ये आता काय चर्चा होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. नाशिकमध्ये मनसेनेही वृक्षतोडीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता वृक्षतोडीच्या मुद्यावरुन राज ठाकरे आणि सयाजी शिंदे एकत्र येऊन तपोवनातील लढा आणखी तीव्र करणार का, हे बघावे लागेल.

यापूर्वी सयाजी शिंदे यांनी तपोवनातील लहान झाडंही तोडता कामा नये, अशी भूमिका घेतली होती. साधू आले, गेले तरी त्याने काही फरक पडत नाही. याविषयी माझा अभ्यास नाही. पण झाडं गेली तर नाशिककरांचं नुकसान होईल. इथलं एकही झाड तुटता कामा नये. झाडं ही आपली आईबाप आहेत. आमच्या आईबापांवर हल्ला केला तर आम्ही मुलं काही इतकी बुळगी नाही. आमच्या आईबापांवर हल्ला केला तर आम्ही गप्प बसणार नाही. गिरीश महाजनांनी यावर उत्तर दिले पाहिजे. ते जबाबदार व्यक्ती आहेत. आपली वैयक्तिक दुश्मनी नाही. दुश्मनी झाली तरी त्याने मला फरक पडत नाही, असे सयाजी शिंदे यांनी म्हटले होते.

आम्ही नाशिकमध्ये १५ हजार झाडं लावणार आहोत. साधूग्राम येथे एकही झाड आम्ही तोडणार नाही. फक्त काही जी लहान झाडं आहेत ती कापावी लागतील. सयाजी शिंदे यांच्यासोबत सुद्धा माझी चर्चा झाली. मी जेव्हा हैदराबादला होतो तेव्हा त्यांच्याशी फोनवर चर्चा केली. त्यांची भूमिका मी समजून घेतली. वेळ पडल्यास मी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करुन त्यांचे आक्षेप समजून घेईन. वृक्षप्रेमी आणि राजकीय नेत्यांची जी भूमिका आहे तीच आमची भूमिका आहे. आधी आम्ही या वृक्षप्रेमींना १५००० झाडं दाखवू. त्यानंतरच आम्ही पुढे जे काही करायचं तो निर्णय घेऊ, असे गिरीश महाजन यांनी सांगितले. तपोवनातील वृक्षतोडी संदर्भात आज नाशिक महापालिकेत महत्त्वाची बैठक होणार आहे.

## थोडक्यात...

### आदित्य ठाकरे विरोधी पक्षनेता होणार?

**नागपूर :** विरोधी पक्षनेतेपदासाठी शिवसेने उबाठाकडून आदित्य ठाकरेंचं नाव पुढे केल्याची सुत्रांची माहिती आहे. भास्कर जाधव यांचं नाव केवळ चर्चेत ठेवून आदित्य ठाकरेंच्या नावाची शिफारस विधानसभा अध्यक्षांकडे केल्याची सुत्रांची माहिती आहे. त्यामुळे यंदाच्या हिवाळी अधिवेशनात आदित्य ठाकरे हे विरोधी पक्षनेता असणार का याकडे लक्ष लागलंय.

### पहिल्यांदाच विरोधी पक्ष नेत्याविनाच अधिवेशन

**नागपूर :** नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून, महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात प्रथमच हे अधिवेशन दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेत्यांविना पार पडत आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र संघर्ष सुरू आहे. विधानसभेत विरोधी पक्षनेते पदासाठी आवश्यक असलेल्या एकूण जागांपैकी किमान १० टक्के जागा (२९ आमदार) कोणत्याही विरोधी पक्षाकडे नाहीत. महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याकडे एकत्रितपणेही पुरेसे संख्याबळ नाही.

### पालघरमध्ये वर्दीतील रक्षकच बनला भक्षक

**पालघर :** वर्दीतील रक्षकच भक्षक बनल्याची संतापजनक घटना पालघरमधून समोर आली आहे. चौकशीसाठी बोलवलेल्या महिलेवर हवालदारानेच लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना पालघर जिल्ह्यातील कासा पोलीस ठाण्याच्या आवारात घडली आहे. शरद बोगाडे असं या हवालदाराचे नाव आहे. याप्रकरणी बोगाडेविरोधात डहाणू पोली स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नांदेडमध्ये तुरीच्या शेतात गांजाची लागवड

**नांदेड :** नांदेडमध्ये तुरीच्या शेतात गांजा लागवड केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आलीये. किनवट तालुक्यातील शिवनी शिवारातील ही घटना आहे. इस्लामपूर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे धाड टाकत ४५ किलो वजनाची गांजाची झाडे जप्त केली आहेत. गांजा लागवड केल्याप्रकरणी एका व्यक्तीला ताब्यात घेतले.

### शिंदेंची विशेष बैठक

**नागपूर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदार आणि मंत्र्यांची विशेष बैठक बोलावली आहे. या बैठकीत स्वीय सहाय्यक किंवा सुरक्षा रक्षकांना प्रवेश दिला जाणार नाही-फक्त मंत्री आणि आमदार उपस्थित राहणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, ही बैठक अलीकडील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घेण्यात येत आहे. नगरपरिषद व नगरपालिका निवडणुकीतील कामगिरी, मिळालेल्या जागांचा आढावा, रणनीती, दगा-फटका कुठे झाला याचे विश्लेषण स्वतः शिंदे घेणार आहेत.

### कोल्हापुरात शिवसेना 'उबाठा'चे आंदोलन

**कोल्हापूर :** कोल्हापुरात शिवसेना उबाठाने आंदोलन केलंय. कर्नाटक सरकारकडून सीमा भागात मराठी भाषिकांवर होणाऱ्या दडपशाहीचा शिवसेना उबाठाकडून निषेध व्यक्त करण्यात आलाय. मराठी भाषिकांच्या बेळगावातील मेळाव्यास कर्नाटक सरकारने परवानगी दिली नाही.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'महात्मा बसवेश्वर'मध्ये संत शिरोमणी संताजी जगनाडे जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, जयंती महोत्सव समिती आणि कार्यालय द्वारा संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, डॉ. जे. एच. देशमुख, हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे, प्रा. व्ही. जे. दुडिले, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि सोपान सुतार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अध्यक्षीय समारोप प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला तर आभार डॉ. जे. एच. देशमुख यांनी मानले.





# भाजपाकडून महापालिका निवडणूक लढविण्यास इच्छुकांची 'भाऊगर्दी'

## दोन दिवसात ६५० पेक्षा अधिक अर्ज दाखल; उद्या अंतिम दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका भाजपाकडून लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांकडून लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने अर्ज स्वीकृतीस प्रारंभ झाला आहे. या प्रक्रियेसाठी इच्छुकांनी मोठी भाऊगर्दी केलेली पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात ७० जागांसाठी ६५० पेक्षा अधिक इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज पक्षाकडे दाखल केले आहे. इच्छुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या दिनांक १० डिसेंबर २०२५ हा अंतिम दिवस असून इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करावेत असे आवहान शहर जिल्हा भाजपाच्यावतीने करण्यात आले आहे.





लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच मनपा निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ केला आहे. प्रदेश भाजपाकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया पार पडत आहे. उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचा शुभारंभ शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, मनपाचे माजी गटनेते ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला होता. भाजपाच्यावतीने निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांची मोठी संख्या असल्यामुळे शहर भाजपा कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. शहरातील अठराही प्रभागातून इच्छुकांची संख्या मोठी असल्याने शहर जिल्हा कार्यालय गर्दीने फुलून गेलेले पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात उमेदवारी मागणाऱ्या इच्छुकांची संख्या ६५० पेक्षा अधिकची झाली आहे.

प्रदेश भाजपकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया सुरु असून या सर्व इच्छुकांची यादी प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे. उमेदवारी निश्चितीसाठी उर्वरित प्रक्रिया पार पाडणे आवश्यक असल्याने इच्छुकांना आपला अर्ज दाखल करण्यासाठी उद्या गुरवार दिनांक १० डिसेंबर २०२५ शेवटचा दिवस असणार आहे. लातूर शहर जिल्हा भाजपा कार्यालय सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत इच्छुकांचे अर्ज स्वीकारले जात असून इच्छुकांनी आपले अर्ज वेळेत दाखल करावेत असे आवाहन शहर जिल्हा भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोजमगुंडे करंडक स्पर्धेत 'दयानंद कला'चेच वर्चस्व

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** लातूरच्या दगडोजीराव देशमुख सभागृहात नुकत्याच पार पडलेल्या दुसऱ्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे करंडक एकांकिका स्पर्धेत दयानंद कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले निर्विवाद वर्चस्व दाखवून दिले आहे.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही दयानंद कला महाविद्यालय व तारांगण थिएटरच्या कलाकारांनी आपल्या दमदार अभिनयाचा ठसा उमटवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ॲड. शैलेश गोजामगुंडे लिखित तर विशाल माशाळकर दिग्दर्शित 'वात्सल्यम' या एकांकिकेने सर्वच स्पर्धकांवर मात करत तब्बल सहा प्रथम क्रमांकाची पारितोषिके पटकावत करंडकावर कब्जा केला.

मिळालेले पारितोषिकांचे मान एकांकिका : प्रथम - वात्सल्यम, दिग्दर्शन : प्रथम - विशाल माशाळकर,पुरुष अभिनय : प्रथम - विजय मस्के, संगीत : प्रथम - रोहन गायकवाड, सुरज साबळे, नेपथ्य : प्रथम - प्रमोद कांबळे,अभिनय गुणवत्ता : प्रथम - अर्जुन पवार. गेल्या वर्षी तृतीय क्रमांक मिळवत आपली ताकद



सिद्ध केलेल्या या संघाने यावर्षी थेट प्रथम पारितोषिक पटकावत एक नवा इतिहास रचला आहे. दयानंद कला महाविद्यालयाच्या या यशामुळे संपूर्ण लातूरमध्ये अभिमानाची भावना दाटून आली आहे. यशस्वी कलाकारांमध्ये विजय मस्के, विशाल माशाळकर, ज्योतिबा बडे, रुपेश सूर्यवंशी, अर्जुन पवार, पवन माने, सुरज साबळे, हरी कुंभार, शरीफ पठाण, सिद्धू स्वामी, योगेश पोटभरे,सीताराम खोडवेकर, लक्ष्मण सूर्यवंशी, वैष्णवी कासले, प्रणिता स्वामी यांचा यशस्वी सहभाग होता.

या विजयानिमित्त दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, संगीत विभाग प्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी व मार्गदर्शक डॉ. संदीपान जगदाळे यांनी संघाचे अभिनंदन केले. दयानंद ही कलाकारांची खाण असून या तारांगणातून अनेक तारे झळाळून बाहेर पडले आहेत, असे प्राचार्यांनी यावेळी सांगितले.

# मजूर कामगारांची नोंदणी करणाऱ्या दलालांना हटवा : कॉ. भोसले



**तभा वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** बांधकाम मजूर कामगारांची नोदणी प्रक्रिया सहाय्यक कामगार आयुक्त जिल्हा कार्यालयातून करावे व मजूर कामगारांची पिळवणुक थांबवावी अनेक दलाल दुकान मांडून अनेक ठीकाणी बसलेले आहेत. ते बोगस नियमबाहाय नोंदणी करून अधिक रक्कम घेवून बांधकाम मजूर म्हणून नोंदणी करून शासनाची दिशाभूल व खर्या मजूर कामगारावर अन्याय करीत आहेत. अशा दलालाना पायबंद घालुन स्वतः कामगार कार्यालया मार्फत पुर्ण नोंदणी प्रक्रिया करावे असे अवाहन भारतीय मजूर युनियनचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार भोसले यांनी केले.

ते पाच नं. चौक येथील शाखा उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

अध्यक्षस्थानी सा. राष्ट्रप्रेम वृत्तपत्राचे संपादक बी.एम. कांबळे होते तर प्रमुख पाहुणे हतिम भाई शेख, समाजसेव सुफी सय्यद होते. पुढे बोलताना कॉ. राजकुमार भोसले म्हणाले मजूर कामगारांनी संघटीत व्हावे आणि आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करावे भारतीय मजदूर युनियन मजूर कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

यावेळी नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पाच नं. चौक शाखेचे अध्यक्ष चंद्रकांत पवार, उपाध्यक्ष खंडू मस्के, सरचिटणीस जयराज गावकरी, सचिव विजयानंद धावरे, सहसचिव मंगेश गायकवाड, कोषाध्यक्ष इस्माईल सय्यद, सह कोषाध्यक्ष अनिल आदमाने, रियाज शेख, बाबासाहेब वाघमारे, संघटक खंडु साधु जावळे, सहसंघटक लोभा राठोड, राजु पठाण, दिपक चौफुले, सल्लागार शेख मुस्ताफ, जालीदर कांबळे, राहुल खंडागळे, बाबु आडे, भगवान शिंदे, उज्वला पवार, शामल आदमाने, पुजा चौधरी, अदिना अधिकार पत्र देवून सत्कार करण्यात आला तर आभार मोतीराम देठणेकर यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने मजूर कामगार उपस्थित होते.

# विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने महापूर येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ५६ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि. च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे.

महापूर येथील या प्रशिक्षण केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान देण्यात आले. प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या ५६ महिलांनी शिलाई कामातील कला आणि कौशल्ये आत्मसात केली. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, गावच्या सरपंच कल्पना माने, ग्राम सदस्य उत्तमराव वरवटे, संदीप माने, ग्रामसेवक अनंत सूर्यवंशी, ग्राम सदस्य श्यामकरण अंकुशे, अमोल कलबंडे, प्रशिक्षक क्रांती उफाडे, गजानन बोयणे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# घरफोड्या करणाऱ्या टोळीला शिताफीने केले जेरबंद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** मागच्या वर्षांपासून लातूर जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील २३ गंभीर घरफोड्या करणाऱ्या टोळीतील चार जणांना लातूर गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केले आहे. या चोरट्यांकडून एकूण ४ लाख ३७ हजार रुपयांचा मुद्देमालही जप्त केला आहे.

लातूर जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून घरफोड्या व चोरीच्या गुन्ह्यांची मालिका सुरू होती. या गंभीर गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानीय गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण आणि वैज्ञानिक तपास पद्धती वापरून घरफोड्या करणाऱ्या आंतरजिल्हा कुख्यात व सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशावरून, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेने ही महत्वाची कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली. स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लातूर-बार्शी रोडवरील लातूर विमानतळ टी-पॉइंट येथे चार संशयित इसम दोन मोटारसायकलीसह थांबलेले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सापळा लावून अजय श्रावण शिंदे, अर्जुन दिलीप भोसले, केशव माणिक पवार, विक्की सजगुऱ्या शिंदे या चार जणांना ताब्यात घेतले. या आरोपींची झडती घेतली असता त्यांच्याकडे सोन्याच्या ३ अंगठ्या,१ गंठण, कानातील फुले, व रोख रक्कम ३२ हजार रुपये मिळून आले. तसेच त्यांनी गुन्ह्यात वापर केलेल्या चोरीच्या १ लाख ३० हजार रुपये किमतीच्या दोन मोटरसायकली हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक एमएच २५ - बी जी १३६८ व टीव्हीएस अपाची एमएच २५ - बी एफ १३८२ जप्त करण्यात आले आहेत.

औसा, किल्लारी, मुरुड, रेणापूर, कासारशिरसी, लातूर ग्रामीण, गातेगाव, भादा आदी ठिकाणच्या १८ घरफोड्या. तसेच उमरगा, धाराशिव ग्रामीण, मंटाळा, मुडबी (बिदर) इत्यादी ठिकाणचे गंभीर चोरीचे एकूण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत. सदरची टोळी ही कुख्यात व सराईत असून एकट्या धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याला नमूद टोळी विरुद्ध चोरी, घरफोडी, दरोड्या सारखे तब्बल ५७ गुन्हे दाखल असल्याचे चौकशीत समोर आले आहे. या आरोपींकडून २ लाख ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, ३२ हजार रुपये रोख व १ लाख ३० हजारांच्या दोन मोटारसायकली असा एकूण ४ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, सुधाकर बावकर यांचे नेतृत्वाखालील पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ, अमितकुमार पुणेकर, पोउपनि. राजाभाऊ घाडगे, पोउपनि. प्रमोद देशमुख ,पोउपनि. अमर केंद्रे, पोलीस ठाणे भादाचे सपोनि. महावीर जाधव, मुरुडचे सपोनि. अशोक उजगरे, सपोउपनि. सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार माधव बिलापटटे, युवराज गिरी, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, तुराब पठाण, राजेश कंचे, मोहन सुरवसे,संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, अर्जुन राजपूत, दिनानाथ देवकते, रियाज सौदागर, प्रशांत स्वामी, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड, मनोज खोसे, राहुल कांबळे, हल्लाळे, प्रविण कोळसुरे, चंद्रकांत केंद्रे, संतोष खांडेकर, व्यंकटेश निटुरे, प्रदीप चोपणे, जांभळे, सुहास जाधव, धनंजय गुट्टे, प्रज्वल कलमे, गोरोबा इंगोले, शैलेश सुडे, सागर आलापुरे, बाबा खोपे, महिला पोलिस अंमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

# राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत पुणे जिल्ह्याला जेतेपद; ठाणेला उपविजेतेपद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे ३५ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद तायक्कांदो स्पर्धेत क्यूरोगी या प्रकारात पुणे जिल्ह्याने ९६ गुण प्राप्त करत सर्वसाधारण विजेतेपद जिंकले तर २९ गुणांवर ठाणे जिल्ह्याने उपविजेतेपद प्राप्त केले असून या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार निकिता पवार जळगाव व कानिफनाथ पोकले पुणे या खेळाडूने पटकावला आहे तर पुमसे या प्रकारात रायगड जिल्ह्याने विजेते पद तर पालघर जिल्ह्याला उपविजेतेपद प्राप्त झाले असुन उत्कृष्ट पुमसे खेळाडू म्हणून मृणाली हरणेकर व वंश ठाकुर यांना पुरस्कार देण्यात आला आहे.

### उत्कृष्ट खेळाडू म्हणून निकिता पवार व कानिफनाथ पोकले यांची निवड




शासन मान्यता प्राप्त ऑलिम्पिक खेळाच्या ३५ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद तायक्कांदो स्पर्धेचे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई यांच्या मान्यतेने तायक्कांदो असोसिएशन ऑफ लातूर या जिल्हा संघटनेने दिनांक ५ ते ७ डिसेंबर दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे आयोजन केले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील प्रतिभावान आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता स्पर्धेचे उद्घाटन लातूर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष ॲड किरण जाधव यांनी केले होते तर पदके व पारितोषिके वितरण तायक्कांदो राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले या स्पर्धेत राज्यातील २८ जिल्ह्यातून ३२० खेळाडू सहभागी झाले होते.

अजिंक्यपद स्पर्धेसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शासनाने निर्गमित केलेल्या वयोगट व वजनी गटातील खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड झालेल्या खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग देण्यात आला तर तायक्कांदो खेळातील क्यूरोगी प्रकारात पुरुष व महिला असे एकूण १६ खेळाडू व क्युरोगी प्रकारात ३५ प्रथम क्रमांकाचे खेळाडु निवड करुन हैदराबाद येथे संपन्न होत असलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागासाठी पाठवले जात आहे अशी माहिती, स्पर्धा आयोजक नेताजी जाधव यांनी दिली.

यावेळी तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया चे सहसचिव तथा स्पर्धा निरीक्षक मिलिंद पठारे, राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे, उपाध्यक्ष दुलीचंद मेश्राम, आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण बोरसे व सुभाष पाटील, के वाय पटवेकर लिंबराज पन्हाळकर यांची उपस्थिती होती तर स्पर्धा यशस्वीतेसाठी एस. व्ही. कुलकर्णी, धनश्री मदने, जान्हवी मदने, गीतांजली नागरगोजे रागिनी क्षीरसागर, अनुश्री कुलकर्णी, विश्वजित जाधव, आकाश मिरगे यांच्यासह जिल्ह्यातील तायक्कांदो खेळाडूंनी परिश्रम घेतले.

# विष्णुदास अग्रवाल यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ डिसेंबर :** येथील प्रिंटिंग व्यवसायातील ज्येष्ठ उद्योजक विष्णुदास रामकिशन अग्रवाल यांचे रविवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



लातूरच्या प्रिंटिंग व्यवसायातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले स्व. विष्णुदास अग्रवाल यांचे लातूरच्या मुद्रण क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय असे योगदान राहिले आहे. स्व. विष्णुदास अग्रवाल यांनी बदलत्या काळाप्रमाणे व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून ट्रेडलपासून ते बहुरंगी ऑफसेट छपाईची संपूर्ण यंत्रणा लातुरात उपलब्ध करून देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी, दि. ८ डिसेंबर २०२५ सकाळी लातूरच्या मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मंडळींची उपस्थिती होती.

स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पश्चात नरेंद्र व कमलकिशोर अग्रवाल ही दोन उद्योजक मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### एमजीएमच्या प्रा.अपूर्वा सोळंके यांना पीएचडी प्रदान

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ. जी.वाय.पाथ्रीकर संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयातील



प्रा.अपूर्वा सोळंके यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. प्रा.अपूर्वा सोळंके यांनी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान विषयात 'एक्स्ट्रॅक्शन ॲण्ड क्लासिफिकेशन ऑफ स्किन लीझन टुवर्ड्स मेलानोमा कॅन्सर यूझिंग मशीन लर्निंग टेक्निक्स' या विषयावर आपले संशोधन केले आहे. प्रा.अपूर्वा सोळंके यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख व सर्व संबंधित प्राध्यापक व सहकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये महापरिनिर्वाण दिन




**बिडकीन :** पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल निलजगाव येथे ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल, उपस्थित होते. कु.आरव ज्ञानेश्वर मोगल, कु.आरफात राहिल कुरेशी यांच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कु.माहि लहू हुड्, कु.काव्या लहू हुड्, कु.आरफात इत्यादि भाषणे केली. मुख्याध्यापक मयूर स्वामी यांनी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन कल्पना साळवे यांनी बाबासाहेब यांच्या जीवनात घडलेले घटना अधोरेखित केले. कार्यक्रमासाठी प्रतीक्षा बत्ताले, सचिन साळवे यांनी मेहनत घेतली.

### भगवती विद्यालयात महापरिनिर्वाण दिन



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन येथे महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक रायभान रत्के यांनी घटनेचे शिल्पकार,भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात केली. या प्रसंगी विद्यालयात विद्यार्थांनी बाबासाहेबांचे जीवन विचार आपल्या भाषणातून सांगितले कमलाकर काळे सरांनी विद्यार्थ्यांना सखोल माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे यांनी तर आभार श्रीधर जऱ्हाड यांनी मानले.

### श्री मोहटादेवी विद्यालयात महामानवाला अभिवादन



**बिडकीन :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली चा कार्यक्रम संपन्न झाला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे सर्वप्रथम पूजन करण्यात आले. नंतर महामानवाच्या जीवन कार्यावर विद्यार्थी व शिक्षकांनी प्रकाश टाकला. यावेळी दीपक कर्डिले, सुभाष गवई, ज्योती गायकवाड, सतीश मुखेकर, प्रशांत शेळके, अंजुम पठाण, शंकर शिरसाट, बद्रीनाथ धरपळे, मुख्याध्यापक महेश घोरतळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### श्री स्वामी राजेंद्रदास देवाचार्य यांच्या हस्ते ध्वजपूजन

**पैठण :** श्रीअग्रपीठाधीश्वर पु.पु.श्री स्वामी राजेंद्र दास देवाचार्यजी महाराज यांचे हस्ते श्रीक्षेत्र पैठण नगरीत शेकडो संतांसमवेत आगमन झाले. दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजुन ४५ मिनटांनी ध्वजपूजन विधी संपन्न झाला. याप्रसंगी आयोजक नाथवंशज योगीराज महाराज गोसावी यांच्यासह शेकडो साधु उपस्थित होते. यावेळी केलेल्या प्रवचनात स्वामीजींनी एकनाथ महाराजांच्या संबंधाने गौरव पूर्वक उल्लेख केला. नाथसंस्थानाधिपती वै. भैय्यासाहेब महाराज गोसावी नगरी, नाथ समाधी मंदिर कमानीजवळ, उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात हा सोहळा संपन्न झाला.

### हळीकरांच्या कुटुंबियांना दोन लाखांचा धनादेश



**पैठण :** श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कडूभाऊ काळे यांच्या मार्गदर्शनातून अपघाती मृत्यू झाल्यास सभासदांच्या वारसांना दोन लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत करण्यात येते या योजनेतून त्या कुटुंबाचा खरा आधार देण्याचे काम संस्था करत असते. श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट पैठण शाखेचे खातेदार सभासद देविदास मधुकर हळीकर यांचे मागील काही दिवसांपूर्वी रोड अपघात होऊन मृत्यू झाला होता. आज त्यांना दोन लाखांचा धनादेश नागेबाबा मल्टिस्टेटच्या वतीने पैठण शाखेचे खातेदार व मान्यवरांच्या उपस्थितीत सुपूर्त करण्यात आला.

### गोरखनाथ गव्हाणे(काथार) यांचा अपघाती मृत्यू

**सोयगाव :** सोयगाव तहसील कार्यालयाचे ग्राम महसूल अधिकारी



गोरखनाथ काशिनाथ गव्हाणे (काथार) (वय.५१)यांचा बुधवार (दि.३) आळंद (ता. सिल्लोड) जवळ भरधाव कारने उडवून अपघात झाला होता.या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू असताना रविवारी (दि.७) दुपारी एक वाजता त्यांचा मृत्यू झाला आहे. रविवारी (दि.७)रात्री खोकडपुरा, कैलास नगर स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन भाऊ, एक बहीण असा परिवार आहे.जरंडी आणि घोसला सज्जाचे ते ग्राम महसूल अधिकारी होते.

# दरोड्याच्या तयारीतील तिघांना अटक

## तीन महिला फरार । एमआयडीसी बिडकीन परिसरातून १.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि ७ डिसेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन औद्योगिक वसाहत परिसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला बिडकीन पोलिसांनी मध्यरात्री थरारक पाठलाग करत जेरबंद केले.

डीएम आय सी परिसरातील सी १०,/ डी १० चौकाजवळ पैठण-छत्रपती संभाजीनगर मार्गावर निलजगाव कडून येणाऱ्या व पैठण कडे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना अडवून दरोडा टाकण्याची तयारी सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही धडक कारवाई करण्यात आली.

याबाबतीत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रात्री १०.३० वाजता सहायक पोलिस निरीक्षक निलेश शेळके व पोलिस उपनिरीक्षक मनोज पाटील सह



पथक गस्तीवर असताना मिळालेल्या माहितीनुसार रात्री १०.५० वाजता पथक डी एम आय सी परिसरात दाखल झाले. पोलिसांची वाहनं पाहताच तीन पुरुष व तीन महिला दोन मोटारसायकलवरून शिवनाईकडे पळून जाऊ लागले पोलिसांनी तात्काळ पाठलाग करत तीन इसमांना पकडले, तर तीन महिला अंधाराचा फायदा घेत पळून गेल्या.तिघांची अंगझडती केली असता एअरगन, गुप्ती, चाकू आणि २ दुचाकीसह एकूण मुद्देमाल १,७७,९६० रुपये जप्त करण्यात आला आहे.याप्रकरणी असलम मंजूर शेख (३२) - साईनगर, चितेगाव, ता. पैठण, गणेश भाऊसाहेब तित्तर (२५) - मुलानी वाडगाव, राजू भाऊसाहेब नजन (२७) - किनगाव, ता. फुलंब्री, हमु - चितेगाव या तीन आरोपींना ताब्यात घेतले असून तीन महिला फरार झाल्या आहेत.आरोपीकडुन जप्त मुद्देमाल मध्ये एअरगन,गुप्ती

फोल्डिंग चाकू,९ लोखंडी क्रएद-ब्लेड,कटर व ब्लेड साठे

मोबाईल हँडसेट,-Access १२५, पांढऱ्या रंगाची स्कुटी क्रमांक(MH-१६-ऊग्र-०८०७), युनिकॉर्न काळया रंगाची दुचाकी क्रमांक (MH-२०-HE-६४६०) असा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस उपनिरीक्षक मनोज पाटील यांच्या फिर्यादीवरून कलम ३१०(४), ३१०(५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे हे करित आहेत. सदरची हि कार्यवाही उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक निलेश शेळके, पोलिस उपनिरीक्षक मनोज पाटील, पोहेकॉ अजिनाथ शेकडे, अमोल मगर, दिपक धनेधर, होमगार्ड विशाल बारहाते, धनराज जाधव, चालक पोना सचिन म्हस्के यांनी केली आहे.बिडकीनमध्ये वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांची ही वेळेवर केलेली कारवाई अत्यंत कौतुकास्पद ठरली आहे.

# श्रुती दुसानेचे सृजन चित्र कला प्रदर्शनामध्ये सादर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.८ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील लिओनार्दो दा विंची स्कूल ऑफ डिझाईनमधील (एलएसओडी) फाईन आर्ट विभागाची विद्यार्थीनी श्रुती गणेश दुसाने हिचे सृजन चित्र फ्रॅगमेंटस ऑफ माईंडऋ पंजाबमधील अमृतसर येथे झालेल्या ९० व्या प्रतिष्ठेच्या अखिल भारतीय कला प्रदर्शनात मांडण्यात आले. नुकतेच झालेले हे प्रदर्शन द इंडियन अकॅडमी ऑफ फाईन आर्टऋया राष्ट्रीय संस्थेतर्फे दरवर्षी निवडण्यात आलेल्या चित्रकार आणि



विद्यार्थ्यांच्या कलाकृतींना सादर करते. आपली ही कलाकृती स्पर्धेसाठी निवडली गेली आणि मांडण्यात आली, याचा आनंद झाला असून मनोमन समाधान वाटले. या संधीमुळे आपला आत्मविश्र्वास वाढला असल्याचे श्रुती हिने सांगितले. या यशाबद्दल श्रुतीचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालिका शुभा महाजन व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. प्रा. राजेश शाह, प्रा. सचिन कांबळे यांचे या सृजन चित्रासाठी श्रुतीला मार्गदर्शन लाभले.

# आरोग्यमंत्र्यांशी डॉक्टरांच्या शिष्टमंडळाची चर्चा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि ७ डिसेंबर :** इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेच्या शिष्टमंडळाने अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची सविस्तर भेट घेतली.

या बैठकीत छोटे व मध्यम नर्सिंग होम, क्लिनिक तसेच डे-केअर सेंटरसमोरील प्रशासकीय अडचणी, नियामक बोजा आणि आवश्यक धोरणात्मक बदल यावर सखोल व परिणामकारक चर्चा झाली.

मांडण्यात आलेल्या बहुतांश मागण्यांवर मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कार्यवाही करण्याची भूमिका स्पष्ट केली. नव्या महाराष्ट्र नर्सिंग होम कायद्याच्या मसुद्यात डॉक्टरांच्या प्रत्यक्ष अनुभवाधारित सूचनांचा समावेश केला जाईल तसेच या कायद्याच्या ड्राफ्टिंग कमिटीमध्ये खच- चे अधिकृत प्रतिनिधी असतील, अशी थेट ग्वाही त्यांनी दिली.

डे-केअर सेंटरसाठी ० ते ५ बेड क्षमतेची स्वतंत्र श्रेणी निर्माण करून नियम शिथिल करण्याचा निर्णय व्यक्त करण्यात आला. याशिवाय लहान शहरांमध्ये नर्सिंग स्टाफची मर्यादित उपलब्धता लक्षात घेऊन पुढील काही वर्षांसाठी या अटीत सवलत देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असेही मंत्री महोदयांनी स्पष्ट केले. नर्सिंग होम नोंदणीची मुदत तीन वर्षांवरून पाच वर्षे करण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली.

चगझगध योजनेतील पॅकेज दर, पेमेंट विलंब आणि विलंब शुल्काबाबत शासनस्तरावर सुधारणा सुरू असून लवकरच त्यावर ठोस निर्णय घेतले जातील, असेही आश्वासन देण्यात आले. या बैठकीमुळे डॉक्टर आणि शासन



यांच्यातील संवाद अधिक सुस्पष्ट, विश्वासार्ह आणि निर्णयाभिमुख झाल्याचे चित्र दिसून आले.

या बैठकीत आय एम ए छत्रपती संभाजीनगर शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. पी. एम. दरक, माजी अध्यक्ष डॉ. राजेंद्र गांधी, शाखेचे सचिव डॉ. योगेश लकताक, तसेच इमिजिएट पास्ट प्रेसिडेंट डॉ. उज्ज्वला दहिफळे यांनी सक्रिय उपस्थिती नोंदवून चर्चेला दिशा दिली. या बैठकीच्या यशस्वीतेत डॉ. आसावरी टाकळकर, डॉ. संगीता शिंदे, डॉ. प्रशांत दरक, डॉ. संभाजी चिंतले, डॉ. जीवन राजपूत, डॉ. अजय माने, डॉ. अमोल कुलकर्णी आणि डॉ. लोखंडे, डॉ बाबासाहेब उनवणे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# २४ तासांत सर्वाधिक सांध्यांची तपासणी करत गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस्

**मुंबई :** अजिंठा फार्माचे उपाध्यक्ष आणि सह-संस्थापक आणि युगांडा प्रजासत्ताकाचे माननीय वाणिज्यदूत, सामाजिक कार्यकर्ते श्री. मधुसूदन अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनने एक महत्त्वाचा सन्मान पटकावला. त्यांच्या पेन-फ्री महाराष्ट्र उपक्रमाचा भाग म्हणून २४ तासात सर्वाधिक गुडघे तपासणी करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा सन्मान पटकावला आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या जपानमधून आलेल्या परीक्षक सुश्री सोनिया उशिरोगोची यांनी आज मुंबईत या विक्रमाला अधिकृतरित्या प्रमाणित केले. महाराष्ट्रातील वंचित समुदायातील ५१२ रुग्णांची वैद्यकीय पथकांनी अखंडितरित्या तपासणी करत होते. वाशिम जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या सर्वात अडचणीत असलेल्या रिसोड येथे २७-२८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान या तपासणीचे आयोजन करण्यात आलेले होते.

# आर्य चाणक्यची विज्ञान प्रदर्शनात जिल्हास्तरावर निवड



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि.८ :** आर्य चाणक्य विद्या मंदिर पैठण येथे ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक विभागातील ३७ शाळांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये आर्य चाणक्य प्रा. विद्या मंदिर पैठणने तृतीय क्रमांक पटकवला. यात उदयमुख तंत्रज्ञान या विषया अंतर्गत शेतकरी व कामगार सुविधा यंत्र हा प्रोजेक्ट बनवला. शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या दृष्टीकोनातून आवश्यक असल्या कारणाने त्या दृष्टीक्षेपात एक पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला आहे. अशा समाजउपयोगी प्रयोगाचे सर्वाकडून कौतुक होत आहे. विषयतज्ञ बाळकृष्ण मुळे व शिवाजी राठोड यांच्या हस्ते विध्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

याबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई चे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, स्था. व्य. स.अध्यक्ष पद्मकुमार कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया,शालेय व्य.स. अध्यक्ष शिवाजी मारवाडी, डॉ. राम लोंढे, डॉ.जयंत जोशी,विजय चाटूपळे, डॉ. अशोक पल्लोड, नंदकिशोर मालाणी, किशोर भाकरे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ज्योती जोशी आदींनी या प्रयोगाचे यशस्वी सादरीकरणाऱ्या विद्यार्थी चि.शिवेंद्र प्रमोद काकडे मार्गदर्शक शिक्षक-सर्फराज अंबेकर, मनोज शिंगारे यांचे अभिनंदन केले.

# प्रतिक्षा पगारेने १७१ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकवला

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.८ डिसेंबर :** राज्य विज्ञान संस्था प्रादेशिक विद्या प्राधिकरण नागपूर अंतर्गत गुरुवारी ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साह पूर्ण पार पडले यात विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण सादरीकरणांनी सर्वांची मने जिंकली घेतली होती प्रतिक्षा विजय पगारे १० वी कै.बाबुरावजी काळे माध्यमिक विद्यालय सोयगाव माथमिक गटातून उत्कृष्ट विज्ञानिक प्रदर्शन, व प्रोजेक्टचे सादरीकरण केले.

गटसाधन केंद्राचे विशेष तज्ञ आणि पर्यवेक्षकांनी केलेले गुणांकाचे एकत्रीकरण केले असता १७१ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरावर मजल मारणारे असल्याने या विद्यार्थ्यांनीचा शुक्रवार (दि.५) कै. बाबुराव काळे माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक निलेश पाटील, प्रा.कमलेश काळे, ज्ञानेश्वर एलीस, योगेश काळे, सागर घाटे, अंजली कथलकर, रूपाली मानकर आदी शिक्षकेतर



कर्मचारी विद्यार्थांच्या उपस्थितीत विद्यार्थीनीचे जंगी स्वागत करण्यात आले.

गटसाधन केंद्राचे विशेष तज्ञ शिक्षक सुनील बावचे, कैलास लांडगे,जगन्नाथ काकडे व प्रतिज्ञा सोनवणे, डॉ.एस.एल. पाटील,आर.टी.जाधव, शेख टी. आर.यांनी प्रमाणिक व काटेकोर मूल्यांकन करून विद्यार्थ्यांना योग्य दिशादर्शन केले.

तालुका स्तरावर प्रथम प्रतिक्षा पगारे कै.बाबुरावजी काळे माध्यमिक विद्यालय सोयगाव, दूतीय भाग्यश्री लक्ष्मण निकम एस.बी.हायस्कूल गोंदेगाव, तृतीय ज्योत्सना वाल्मिक पाटील जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव तर माध्यमिक गटातून प्रथम प्राची सोनवणे, शुभ्रा सोहनी, जयश्री कोळी या विद्यार्थीनी तयार केलेला शाश्वत शेती उपकरणाला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

दुतिय नंदिता सतिष बावस्कर जि.प. शाळा सावरखेडा, तृतीय वेदिता समाधान वबावस्कर आणि इतर कै. बाबुरावजी काळे माध्यमिक विद्यालय सोयगाव यांची निवड झाली या निवडीबद्दल विद्यार्थी, शिक्षकाचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे केंद्र प्रमुख फिरोज तडवी, पालक, गावकरी यांनी अभिनंदन केले.

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क. २०२५/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर २५० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक २४-०९-२०२५
अर्जदार ०: श्री/श्रीम. लतीफ युसूफ पठाण रा.गराडा पो. ब्राम्हणी ता. कड जि. संभाजीनगर.
विरूद्ध
गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय गराडा ता. कन्नड/ ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर.
विषय : **जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.**
उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ॲड. मार्फत/ स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा उमेर लतीफ पठाण चा जन्म दिनांक ०३-०४-२०२१ रोजी गराडा ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांच्या मुलगा चा जन्म दिनांक ०३-०४-२०२१ रोजी गराडा ता. कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर जाहिर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा उमेर लतीफ पठाण यांचा जन्म दिनांक ०३-०४-२०२१ रोजी गराडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०३-११-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०३-०४-२०२१ रोजी गराडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.
करिता दिनांक ...../०९/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.
**उपविभागीय अधिकारी कन्नड**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३१५/२०२५
अर्जदार १. तुळसाबाई गोविंदा ढगे, वय ६२ वर्षे, धंदा. मजुरी, २. गणेश गोविंदा ढगे, वय ४२ वर्षे, धंदा. मजुरी, ३. ज्ञानेश्र्वर गोविंदा ढगे, वय ३६ वर्षे, धंदा. घरकाम, ४. संजय गोविंदा ढगे, वय ३३ वर्षे, धंदा. घरकाम, ५. समाधान गोविंदा ढगे, वय ३० वर्षे, धंदा. घरकाम, सर्व रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.
- विरुद्ध - गैरअर्जदार :- कोणीही नाही.
प्रकरण :- **वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. व्ही. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत आनंदा दौलत ढगे हे दि. ०२/०८/२०१३ रोजी मौजे. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे अंतीम मृत्यू पावलेले असून, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारसदार असे अर्ज व न्यायालयात सांगितलेलेले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत आनंदा दौलत ढगे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्रांना हरकत व/वा आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह पुराव्यासह हजर असून नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.
पुढील तारीख :- ०८/०१/२०२६.
आज दि. ०५/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.
**सही / - विभागीय लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.**
**सहायक अधिक्षक सही / -**
**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.)**
**प्रत. १. दिवाणी न्यायालय क.स्तर. सोयगाव - नोटीस बोर्ड. २. ग्रामपंचायत आमखेडा, ता.सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,**
**सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**
दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३१२/२०२५.
१.कचरूलाल राजमल जैन, वय, ५५ वर्षे, धंदा, मजुरी, २.ईश्वर राजमल जैन, वय, ४६ वर्षे, धंदा, मजुरी, दोघेही रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३.वंदना सुरेशचंद्र ओस्तवाल, वय ५० वर्षे, धंदा. घरकाम, रा. आदर्श नगर, पिंपळगांव राजा, ता. खामगांव, जि. बुलढाणा. ४.कल्पना नरेंद्र लोढा, वय. ५८ वर्षे, धंदा. घरकाम, नि. रा. टिळक नगर, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.
५.ज्योती रतनलाल पगारीया, वय. ५६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सुतार गल्ली, जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव. ६.मंगला माणिकलाल बोथरा, वय. ७४ वर्षे, धंदा. घरकाम, रा. जुना आग्रा रोड, ईगतपुरी, ता. ईगतपुरी, जि. नाशिक. ७.चंद्रकला पोपटलाल सुराणा, वय. ६८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. पिंपळगांव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक.
-विरुध्द- गैर अर्जदार - कोणीही नाही.
प्रकरण- **वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत राजमल अमलोक जैन हे दि. २७/०१/२०१९ रोजी मौजे. पळासखेडा ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा म्रुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ७ हे मयत राजमल अमलोक जैन यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.
पुढील तारीख :- ०८/०१/२०२६.
आज दि. ०५/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.
आदेशावरुन,
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.**
**विभागीय लिपीक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.**
**प्रत :- १. दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव - नोटीस बोर्ड.२. ग्राम पंचायत, पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,**
**सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**
दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३१४/२०२५.
१.गजानन भगवान मुरमुटे, वय २८ वर्षे, धंदा. मजुरी, रा. घोसला, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद. २.ममता अमोल निकम, वय ३६ वर्षे, धंदा. घरकाम, गैरअर्जदार प्रकरण रा. नादरपुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.
- विरुध्द - गैरअर्जदार- कोणीही नाही
प्रकरण - **वारस प्रमाणपत्र मिळणें बाबत.**
सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत आशाबाई भगवान मुरमुटे हे दि. २८/०४/२०२४ रोजी मौजे. घोसला, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा म्रुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत आशाबाई भगवान मुरमुटे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.
पुढील तारीख :- ०८/०१/२०२६.
आज दि. ०५/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.
विभागीय लिपीक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.
**आदेशांवरुन,**
**सहायक अधिक्षक**
**(दिवाणी न्यायालय कतर, सोयगांव.)**
**प्रत-**
**१.दिवाणी न्यायालय क.स्तर.सोयगाव- नोटीस बोर्ड.**
**२. ग्रामपंचायत,घोसला ता.सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),**
**सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद,**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. :- ३१६/२०२५.
अर्जदार:- १) जिजाबाई बाबुराव वानखेडे, वय- ७८ वर्षे, धंदा- शेती. २) उज्वला कैलास धनेधर, वय- ५३ वर्षे, धंदा:- शेती. ३) रविंद्र बाबुराव वानखेडे, वय:- ५१ वर्षे, धंदा:- शेती, वरील सर्व अर्जदार रा. बहुलखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).
// विरूध्द // गैरअर्जदार :- निरंक.
अर्ज:- **वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**
सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे बाबुराव भिका वानखेडे हे दिनांक १०/०९/२०२५ ला मौजे बहुलखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.
(पुढील दिनांक:- २२/०१/२०२६).
तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दिनांक :- ०६/१२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.
**विभागीय लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव**
प्रतीलीपी:- १. मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब, सोयगांव नोटीस
ता. सोयगांव जि. औरंगाबाद. २. गृप ग्राम पंचायत, बहुलखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर**
**सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**
किरकोळ दिवाणी अर्ज क. : ३१३/२०२५
१.सुरेश विश्वासराव अवचार, वय-७१ वर्षे, (मुलगा), रा. छत्रपती संभाजीनगर, ता. व जि. छ. संभाजीनगर, २.संजिवनी अशोकराव मोरे, वय ६८ वर्षे, (मुलगी), रा. नाशिक, ह.मु. छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छ. संभाजीनगर, ३.अनंत विश्वासराव अवचार (मयत) वारस, रा. जळगांव, ता. जि. जळगांव. ३.अ.कल्पना अनंत अवचार, वय ५५ वर्षे, (पत्नी), ३.ब.अक्षय अनंत अवचार, वय ३३ वर्षे, (मुलगा) दोघे रा. वाडी बनोटी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. ३.क.अश्विनी अनंत पाटील, वय ३७ वर्षे, (मुलगी) रा. आहेर गल्ली, नायडोंगरी, जि. नाशिक.
विरुद्ध - गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण - **वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.**
सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत दुर्गाबाई विश्वासराव अवचार हे दि. २४/१०/२०१६ रोजी वाडी सुतांडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ३-क हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ३-क हे मयत दुर्गाबाई विश्वासराव अवचार यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.
पुढील तारीख- २३/०१/२०२६.
आज दि. ०६/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.
**विभागीय लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव**
प्रत
१. दिवाणी न्यायालय (क.स्तर), सोयगांव नोटीसबोर्ड.
२.ग्राम पंचायत वाडी सुतांडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.

## अग्रलेख...

# गंगा आणि व्होल्गाचा संगम

गेल्या गुरुवारी सायंकाळी रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमिर पुतिन यांचे विमान पालम विमानतळावर उतरताच क्रेमलिनला आश्चर्याचा धक्का बसला. पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रोटोकॉल तोडून पुतिन यांच्या स्वागतासाठी गेले होते. पुतिन यांच्या कार्यालयालाही याची जाणीव नव्हती. आमचे एवढे भव्य स्वागत होईल आणि स्वतः पंतप्रधान मोदी स्वागताला येतील याची कल्पना आम्हाला नव्हती, अशी प्रतिक्रिया क्रेमलिनने दिली. तसेही आश्चर्याचा धक्का देण्यात मोदी पटाईत आहेत. त्यांनी आतापर्यंत एवढे धक्के दिले आहेत की अनेकांची त्रेधातिरपीट उडाल्याचे कित्येक अनुभव आहेत. आज जगाचे थेट दोन गट पडले आहेत. एक गट अमेरिकेच्या तर दुसरा रशियाच्या प्रभावाखाली आहे. नाटो गटातील देश जसे थेट अमेरिकेच्या प्रभावाखाली काम करतात, तसा शिक्का भारताच्या माथी नाही. मॉस्को आणि नवी दिल्ली यांचे संबंध सात दशकांचे असले तरी जागतिक राजकारणात भारताचे धोरण कायम तटस्थ राहिले आहे. मानवीय आधार सोडला तर राजकीय अथवा लष्करीदृष्ट्या भारताने कधीही कुण्या एका देशाची अथवा जागतिक संघटनेची तळी उचललेली नाही. रशिया आपला सर्वाधिक जवळचा मित्र देश आणि हितचिंतक असला तरी आवश्यक वाटले तेव्हा त्याला कानपिचक्या द्यायलाही आपण मागेपुढे पाहिले नाही. पुतिन भारत-रशिया द्विपक्षीय परिषदेसाठी दिल्लीला आले होते त्यामुळे त्याकडे जगाचे लक्ष लागून होते. कारण, अमेरिकेने थेट भारतविरोधी भूमिका घेत ५० टक्के व्यापार शुल्क लादले आणि रशियाकडून तेल विकत घेऊ नये म्हणून प्रचंड दबाव आणला.

गेल्या जुलै-ऑगस्टमध्ये ५० टक्के व्यापार शुल्क आकारूनही भारताने त्याला शांतपणे तोंड देत एकीकडे वॉशिंग्टनला चर्चेच्या टेबलावर येण्यास भाग पाडले तर दुसरीकडे डोनाल्ड ट्रम्प यांचे मानमर्दन केले. भारत व्यापार शुल्क कमी करावे म्हणून विनवणी करेल, या अपेक्षेत ट्रम्प होते; पण मोदी यांनी वाढीव शुल्काचा सामना करीत देशाची मान खाली जाईल, असे काहीही केले नाही. ही सर्व पृष्ठभूमी पाहता पुतिन यांचा दौरा अत्यंत महत्त्वाचा ठरला. भौगोलिकदृष्ट्या जगातील सर्वांत मोठा असलेला देश रशिया आणि सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश भारत यांच्यातील संबंध आणि भागीदारी ही दीर्घकालीन असून ती शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वास यावर आधारित आहे. विशेष म्हणजे दोन्ही राष्ट्रप्रमुख हे कर्मठ आणि देशहिताला प्राधान्य देणारे आहेत. युक्रेन युद्ध आणि अमेरिकेच्या आडमुठ्या व्यापारी धोरणामुळे जागतिक व्यापारावर नकारात्मक परिणाम झाले. याचा फटका विशाल लोकसंख्या असलेल्या भारताला बसणे स्वाभाविक होते. युरोपातील ग्रीससारख्या छोट्या देशांमध्ये तर ब्रेडसाठी रांगा लावण्याची वेळ नागरिकांवर आली. भारताची ऊर्जाविषयक गरज मोठी आहे. ऊर्जा साधनांच्या पुरवठ्यात बाधा येऊ नये म्हणून भारताने रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची आयात सुरू केली. यामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर जवळपास स्थिर राहिले. आतापर्यंत आखाती देश कच्च्या तेलाचा उपसा कमी करून आर्थिक फायदा करून घेत होते. परंतु, युक्रेन युद्धानंतर परिस्थिती बदलली. अमेरिकेच्या आर्थिक निर्बंध लादण्याच्या इशाऱ्यानंतरही चीन आणि तुर्कस्थाननंतर रशियाकडून तेल खरेदी करण्यात आजही भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्यात अमेरिकेने रशियाच्या लुकोईल आणि रोस्नेफ्ट या सर्वांत मोठ्या तेल उत्पादक कंपन्यांवर निर्बंध लादल्याने भारताला नोव्हेंबर महिन्यापासून तेल आयातीत कपात करावी लागली. पण, पुरवठा साखळी बाधित होऊ नये व ऊर्जा सुरक्षा कायम ठेवण्यासाठी भारताने अमेरिका, आखाती देश आणि आफ्रिका खंडातील देशांकडून आयात वाढविली. एका अर्थाने व्यापाराच्या संदर्भात भारताने अमेरिका आणि रशिया या दोघांना एकाच पारड्यात मोजले. भारताची ही भूमिका म्हणजे एक प्रकारे रशिया आणि पश्चिम देशांमधील संवादसेतूसारखी आहे. कोणत्याही एका गटाकडे झुकण्याऐवजी दिल्ली संतुलन राखत आहे. हीच शांत प्रबुद्ध भूमिका कौतुकास पात्र ठरणारी आहे.

पुतिन यांचा दौरा हा भारतासोबतच्या ऐतिहासिक मैत्रीचे पुनरुज्जीवन करणारा, ऊर्जा-अणुऊर्जा-संरक्षण क्षेत्रांत २०३० पर्यंतच्या नव्या आर्थिक सहकार्याची पायाभरणी आणि जागतिक संघर्षाच्या काळात शांततेचा सांस्कृतिक संदेश देणारी गीता हा कूटनीतीचा विषय ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुतिन यांना रशियन भाषेत भाषांतर केलेली गीता भेट स्वरूपात दिली आहे. याचा अर्थ फार गहन आहे. रशिया गेल्या तीन वर्षांपासून युद्ध परिस्थितीशी झुंजत आहे. युक्रेनच्या खांद्यावर बंदूक ठेवून अमेरिका आणि नाटोचे सदस्य असलेले युरोपियन देश रशियाला जखमी करण्याचे प्रयत्न करीत आहेत. पण, पुतिन कुठल्याही परिस्थितीत माघार घेण्यास तयार नाहीत. आज युक्रेनचा जवळपास २० टक्के भूभाग रशियाच्या ताब्यात आला आहे. या भूभागावरील हक्क सोडला तरच युद्धबंदीची तयारी पुतिन यांनी दर्शविली आहे. युद्ध सुरू असतानाही पुतिन यांनी दिल्लीचा दौरा करीत भारत जागतिक राजकारणात रशियासाठी किती महत्त्वाचा भागीदार आणि विश्वासू देश आहे हे दाखवून दिले आहे.

जागतिक राजकारणात रशिया सध्या एकटा पडला आहे. अशा संकटाच्या काळात शंभर कौरव आणि कौरव सेनेने घेरले असले तरी भगवान श्रीकृष्ण यांच्यासारखा सखा पांडवांच्या पाठीशी आहे, असा संदेशच मोदी यांनी पुतिन यांना गीता भेट देऊन दिला आहे. सोबतच या माध्यमातून मोदी यांनी युद्धमैदानावर शत्रूशी कसे वागावे याचे स्मरणच पुतिन यांना करून दिले आहे, असे म्हणावे लागेल. गीता भेट देऊन त्यातील मैत्री भाव या आध्यात्मिक संदेशाचा विचार करण्याची आणि संघर्षाऐवजी संवादावर भर देण्याची आवश्यकता असल्याचा संदेशच दिला आहे. सांस्कृतिक प्रतीकांचा वापर करून पंतप्रधान मोदी वेगळ्या प्रकारची कूटनीती राबवीत असल्याचे या माध्यमातून दिसून आले आहे.

व्यापार आणि ऊर्जा हा २३ व्या शिखर परिषदेचा प्रमुख अजेंडा होता. येत्या पाच वर्षांमध्ये १०० अब्ज डॉलर्स व्यापाराचे लक्ष्य ठेवण्यात आले. सध्या हा आकडा ७० अब्ज डॉलर्स एवढा आहे. तेल आणि नैसर्गिक वायू क्षेत्रात करार करून रशियाने दीर्घकालीन ऊर्जा व्यापार वाढविण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. भारतात वाहतूक आणि सेवा क्षेत्रात प्रचंड संधी आहेत. याचा लाभ घेण्यासाठी रशियन गुंतवणूकदार उत्सुक असल्याचे पुतिन यांनी म्हटले आहे. भारत स्वस्त आणि कार्यक्षम इलेक्ट्रिक वाहने, दुचाकी वाहने आणि सीएनजी वाहतूक क्षेत्रात आघाडीवर आहे, तर रशियाकडे प्रगत तंत्रज्ञान आहे. दोन्ही देश जर एकत्र आले तर वाहन आणि सेवा क्षेत्रात मोठी क्रांती घडून या संदर्भातील इतर देशांच्या गरजा पूर्ण केल्या जाऊ शकतात. मोदी यांनी रशियाच्या मदतीने युरेशियन इकॉनॉमी युनियनशी मुक्त व्यापार करार करण्यासाठी बोलणी सुरू केली आहे. रशिया, आर्मेनिया, बेलारूस, कझाकस्तान, किरगिझीस्तान या पाच देशांचा या युनियनमध्ये समावेश आहे. वाहतूक कॉरिडॉर हा सुद्धा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. मोदी-पुतिन यांनी चेन्नई-व्लादिवोस्तोक आणि नॉर्दन सी रूट या मार्गावर पायाभूत सुविधा निर्माण करण्यास सहमती दर्शविली आहे. या दौऱ्यात पुतिन भारताला एस-४००, एस-५०० या अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणाली आणि सुखोई-५७ ही लढाऊ विमाने विकण्याचा सौदा करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. पण, संरक्षण सामुग्री विषयक सौद्यांसाठी सध्याची परिस्थिती अनुकूल नाही. युद्धापेक्षा शांततेला महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे व्होल्गा लाल न होता शीतल राहूनच पवित्र गंगेप्रमाणे वाहत राहावी आणि यातच सर्वांचे भले आहे. त्यामुळे या मैत्री पर्वाचे आपण स्वागत केले पाहिजे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# चार देश, दोन करार!

रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांनी आपल्या नवी दिल्ली दौऱ्यात भारताशी लष्करी सहकार्याचा महत्त्वाचा करार केला आणि दुसरीकडे चीन-पाकिस्तान यांच्यात लष्करी सहकार्यासाठी संयुक्त लष्करी कवायत केली जात आहे.

भारत-रशिया यांच्यातील लष्करी सहकार्य ही नवी बाब नाही. सोवियत युनियन असताना तत्कालीन सोवियत नेते लिवोनिद ब्रेझनेव्ह व भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ वर्षांचा मैत्री करार केला होता, त्यात लष्करी सहकार्याचा उल्लेख करण्यात आला होता.

**नवा करार :** रशिया-भारत यांच्यात झालेल्या नव्या करारानुसार दोन्ही देश परस्परांशी लष्करी सहकार्य करणार आहेत. लष्करी मनुष्यबळ, तंत्रज्ञान, लष्करी उपकरणे यांचा यात समावेश आहे. यात दोन्ही देशांनी संयुक्त लष्करी कवायत करण्याचीही तरतूद आहे. रशियाची संसद 'ड्युमा'ने या कराराला मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रपती पुतिन यांनी नवी दिल्ली दौऱ्यात त्यावर सही केली. युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर प्रथमच पुतिन भारत दौऱ्यावर आले होते आणि या दौऱ्यात महत्त्वाच्या अशा लष्करी करारावर सह्या करण्यात आल्या. या करारातील सर्वांत महत्त्वाची व नवी बाब म्हणजे दोन्ही देश परस्परांच्या भूमीवर लष्करी तळ स्थापन करू शकणार आहेत. आजवर हे झाले नव्हते.

**कराराची पार्श्वभूमी :** भारत-रशिया यांच्यात झालेल्या या करारात ही एकच बाब नवी असली तरी त्याला लाभलेली पार्श्वभूमी नवी आहे. ही पार्श्वभूमी आहे भारत-अमेरिका यांच्या संबंधात आलेल्या तणावाची. एकीकडे अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात करण्यावर आक्षेप घेतला आहे. भारताने ही आयात थांबवावी असे प्रतिपादन ते वारंवार करीत आहेत. भारतावर दबाव आणण्यासाठी त्यांनी बरेच निर्णय घेतले आहेत. भारतातून केल्या जाणाऱ्या आयातीवर मोठे शुल्क लावले आहे. याचा परिणाम दिसू लागला आहे. भारतातून अमेरिकेत होणारी निर्यात कमी झाली आहे. याचा फटका काही क्षेत्रांना बसू लागला आहे. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया पुन्हा घसरला आहे. आता एका डॉलरसाठी ९० रुपये मोजावे लागणार आहेत. याचाही दुष्परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होईल असे मानले जाते. तरीही भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात करणे बंद केलेले नाही, मात्र ते कमी केले आहे. अमेरिकेने एकप्रकारे भारताच्या विरोधात अघोषित आर्थिक युद्ध पुकारले आहे.



**नवा अहवाल :** अमेरिकन काँग्रेससमोर नुकताच ८०० पृष्ठांचा एक नवा अहवाल सादर करण्यात आला असून त्यात ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करण्यात आला आहे. भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या चार दिवसांच्या लष्करी संघर्षाचे सविस्तर विश्लेषण त्यात करण्यात आले असून एकप्रकारे या संघर्षात पाकिस्तान विजयी झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. हवाई युद्धात पाकिस्तानने अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला व तो भारतावर भारी पडला असे त्यात म्हटले आहे. अमेरिकेने हा निष्कर्ष कशाच्या आधारवर काढला हे समजण्यास मार्ग नाही. म्हणजे अमेरिका सतत भारतविरोधी भूमिका घेत असताना भारत-रशिया लष्करी सहकार्याचा करार झाला आहे. रशिया भारताला काही लष्करी उपकरणे पुरविणार आहे. यात एस-४०० या हवाई सरंक्षण प्रणालीचा समावेश आहे. हा करार करून भारताने अमेरिकेला एकप्रकारे चपराक लगावलेली आहे. आता यावर अमेरिका कोणती कारवाई करणार याकडे भारताचे लक्ष राहणार आहे.

**नाराजी अपेक्षित :** अमेरिका या कराराने संतप्त होईल हे भारताने गृहीत धरले आहे. मात्र, राष्ट्रपती ट्रम्प कोणकोणते निर्णय घेतील याचा अंदाज आज व्यक्त करणे अवघड आहे. भारत व पंतप्रधान मोदी आपले मित्र आहेत असे म्हणत म्हणत त्यांनी भारताच्या विरोधात व पाकिस्तानच्या बाजूचे निर्णय घेतले आहेत. राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात भारताला अनुकूल असे निर्णय घेतले होते, आता ते नेमके उलट निर्णय करीत आहेत. त्यांच्यात झालेल्या या बदलाचे समाधानकारक उत्तर अद्याप तरी मिळू शकलेले नाही.

**दुसरा करार :** दुसरीकडे पाकिस्तान-चीन यांच्यात लष्करी कवायत सुरू झाली आहे. चीनची पीपल्स लिबरेशन आर्मी व पाकिस्तान लष्कर यांच्यात ही संयुक्त लष्करी कवायत केली जात असल्याचे पाकिस्तानने घोषित केले आहे. पाकिस्तानच्या मंगला कोअर या लष्करी विभागाचे जवान यात सहभागी झाले आहेत. पाकिस्तान लष्कराच्या रचनेत मंगला कोअर हा सर्वांत महत्त्वाचा मानला जातो. ऑपरेशन सिंदूरमध्ये चीनने पाकिस्तानला सर्व प्रकारचे लष्करी साहाय्य केले होते. फक्त चिनी जवान मैदानात उतरले नव्हते. ते आता पाकिस्तानच्या भूमीवर जाऊन पाकिस्तानी सैनिकांसोबत लष्करी कवायत करीत आहेत.

**जुना इतिहास :** भारत-रशिया मैत्रीला जसा जुना इतिहास आहे, पाकिस्तान चीन मैत्रीलाही जुना इतिहास आहे. चीनने पूर्वीपासून पाकिस्तानला भारताच्या विरोधात वापरण्याचे धोरण स्वीकारले आहे. वेळोवेळी त्याने पाकिस्तानला मदत केली आहे. मात्र अलिकडच्या काळात यात एक बदल झाला आहे. चीन पूर्वी पाकिस्तानला फक्त आर्थिक मदत करीत होता आणि लष्करी सहकार्याची भूमिका अमेरिका पार पाडीत होती. चीनचे अपुरे लष्करी तंत्रज्ञान हे त्याचे एक कारण मानले जात होता. आता चीनने लष्करी तंत्रज्ञानात मोठी प्रगती केली असल्याने त्याने आपल्या लष्करी सहकार्याचा ओघ पाकिस्तानकडे मुक्त हस्ते वळविला आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये ते दिसून आहे. चीनचे ८१ टक्के लष्करी साहित्य आणि जवळपास १०० टक्के लष्करी तंत्रज्ञान या संघर्षात वापरण्यात आले. भारतीय लष्करी अधिकाऱ्यांनी हा खुलासा केला आहे.

**युद्धाची तयारी? :** दरम्यान, पाकिस्तानचे फिल्ड मार्शल यांनी भारताच्या विरोधात व्यापक युद्ध करण्याची तयारी सुरू केली असल्याचे म्हटले जात आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा आत्मविश्वास अचानक वाढला असल्याचे सांगितले जात आहे. त्याचाच आधार घेत मुनीर यांनी ही तयारी चालविली असल्याचे म्हटले जात आहे. मात्र, मुनीर असा निर्णय अमेरिका व चीन यांच्या सहकार्याशिवाय घेणार नाहीत असेही म्हटले जाते आणि ही बाब सत्य आहे. पाकिस्तान स्वबळावर कधीही भारताचा मुकाबला करू शकत नाही. कधी चीन तर कधी अमेरिका या दोन महाशक्तींनी त्याला वेळोवेळी मदत केली आहे. आता निर्माण झालेली स्थिती जरा वेगळी आहे. पाकिस्तानला या दोन्ही महाशक्तींचा पाठिंबा मिळत आहे आणि भारतासाठी ही जरा चिंतेची बाब आहे.

**प्रश्न जीपीएसचा :** ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानच्या विरोधात भारताने अमेरिकन जीपीएस प्रणालीचा वापर केला. पाकिस्तानी विमानांची स्थिती, पाकिस्तानी हवाई तळांची स्थिती यावर हल्ले चढविण्यासाठी जीपीएस म्हणजे ग्राऊंड पोजिशनिंग सिस्टिमचा भारताला भरपूर फायदा झाला. भारत-पाकिस्तान संघर्ष झडल्यास अमेरिका आपल्या या प्रणालीचा भारताला उपयोग करू देईल काय ही ती चिंता आहे. यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न भारतीय वैज्ञानिक करीत आहेत. मात्र त्यास काहीसा कालावधी लागणार आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर भारताने रशियाशी लष्करी करार करून एक योग्य पाऊल टाकले आहे. जगाच्या राजकारणावर याचे साद-पडसाद उमटणार हे निश्चित.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# हे 'धर्मयुद्ध' नाहीच!

जवळपास महिनाभरापूर्वी अल फलाह विद्यापीठाचे गुऱ्हाळ समोर आले. आपल्या देशात सर्वांच्या नाकाखाली राहून काही तथाकथित सुशिक्षित वर्गातील घटक देशविघातक कारवायांमध्ये लिप्त असल्याचे रहस्योद्घाटन झाले. संपूर्ण देशासाठी हा फार मोठा हादरा होता. आतापर्यंत अशिक्षितपणामुळे जिहादसारख्या संकल्पना रुजल्या, असे म्हटले जात असताना अगदी डॉक्टर मंडळींसारखी उच्चविद्याविभूषित, बॉम्बस्फोटासारख्या कटकारस्थानात कित्येक वर्षांपासून गुंतल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. हे कथित सुशिक्षित लोक समाजात एक मानाचे स्थान बाळगून असताना प्रत्यक्षात कोणत्या जिहादी मानसिकतेत जगत होते, हा विचार आता समाजतज्ज्ञांना कोड्यात टाकणारा ठरतोय्. धर्मासाठीचा कट्टरपणा देशाभिमानापेक्षा कसा काय मोठा होतो, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो.

या सर्व समस्या देशाला संकटात टाकणाऱ्या असतात. यात कुठेतरी पाकिस्तानचा हात आहे, वगैरे तपासांती सिद्ध झाले की खरा प्रकार लक्षात येतो. पण, याने देश अस्थिर होतो, ही वास्तविकता आहे. अशावेळी देशातील नेतेमंडळींचे काम समाजाला भरकटण्यापासून वाचविणे, कायदा-सुव्यवस्था जतन करणे, शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे हे असते. मात्र, काही नेते याही स्थितीत आपले भलतेच 'राजकीय' अजेंडे राबवीत आहेत. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे आमदार हुमायूं कबीर यांनी ६ डिसेंबरला बंगालमध्ये बाबरी मशिदीचा शिलान्यास करण्याचा घाट घातला. त्यासाठी देशभरातील मुस्लिमांना आवाहन केले. अनेक मुस्लिम विटा घेऊन मुर्शिदाबादला पोहोचले देखील. हा सर्व प्रकार समृद्धीच्या दिशेने अग्रेसर, शांत, समंजस, प्रगतिशील आणि तितक्याच सक्षम भारतात घडत होता. शांत, नितळ पाण्याला गढूळ करण्याचा हा प्रकार तृणमूलच्या या नेत्याने घडवून आणला. त्यावर तृणमूलच्या नेत्या आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ताबडतोब हुमायूं यांच्यावर कारवाई करत त्यांना पक्षातून निलंबित केले. या धर्मांधतेला तृणमूलमध्ये थारा नाही, असा संदेश यातून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आता हुमायूं स्वतःचा पक्ष काढून ममतांना आव्हान करतो आहे. वरवर पाहता हे दोन नेते एकमेकांविरोधात उभे ठाकल्याचे दृश्य आहे. पण, प्रत्यक्षात असेच घडत आहे का, हा प्रश्न प्रत्येक सुजाण नागरिकाने स्वतःला विचारला पाहिजे. पश्चिम बंगालमधील निवडणुकीच्या आधी काहीतरी 'हलचल' होणे गरजेचे होते. त्यातून तर हा प्रकार घडवून आणलेला नाही, या दिशेने विचार व्हायलाच हवा. कारण ममतांचे वैशिष्ट्य आहे की, निवडणूक जवळ आली की त्या सहानुभूती लाटण्यासाठी वाट्टेल ते करतात. कधी त्यांचा अपघात होतो, मग त्या व्हीलचेअरवर मत मागत फिरतात. कधी त्यांच्या डोक्याला दुखापत होते. मग त्या पट्टी लावून भाषणबाजी करतात. आता हे फंडे वापरणे नित्याचे झाले आणि लोकांनाही ते कळत असल्याने त्यांनी नवा डाव टाकला असावा.



हुमायूं यांच्या बाबरी उभारण्याच्या प्रकाराला प्रत्युत्तर म्हणून हिंदू संघटनांनी भव्य गीता पठनाचे आयोजन केले. त्यातही अगदी राज्यपालांपासून बड्या हस्तींनी सहभाग नोंदवला. हुमायूंच्या बाबरीला गीता पठनाने उत्तर देण्याचा प्रकार हिंदूंच्या सामाजिक आणि धार्मिक अस्मितेचा विषय बनला. बंगालमध्ये घडत असलेल्या राजकीय घडामोडी त्याचे सामाजिक पडसाद स्पष्टपणे राजकीय धर्मवादाचे चित्र दाखवत आहे. तुमच्याच पक्षातील एक आमदार बाबरी उभारण्याची घोषणा करतो आणि तुम्ही पक्षप्रमुख, राज्याच्या प्रमुख म्हणून त्याला नियंत्रित करू शकत नाही, हे अजिबात शक्य नाही. उलट, राज्याच्या प्रमुखाचा वरदहस्त असल्याशिवाय इतका मोठा प्रकार घडवून आणणे निव्वळ अशक्य आहे. देशात हिंदू धर्मीयांमध्ये एकोप्याची भावना, संघटित राहण्याची जिद्द वाढीस लागली असल्याने आता धार्मिक कट्टरतेचे पत्ते पिसावे लागणार हे ममतांना वाटले असणार आणि त्यातूनच त्यांनी हा नवा डाव टाकला असणार. पण, त्यांनी काहीही केले तरी हे धर्मयुद्ध नाही आणि या सर्व प्रकाराला तसे रंगवण्याचा प्रयत्नही कोणी करू नये. कारण धर्मयुद्ध उदात्त हेतूसाठी केले जाते. केवळ कोणाच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी नाही. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा केवळ महाभारतासारखा विनाश घडवतात किंवा पानिपत करतात. त्यामुळे ममतांचा हा डाव आणि हुमायूंसारखा मोहरा वापरणे बंगालमधील जनतेने डोळसपणे बघावा, एवढीच अपेक्षा आपण करू शकतो.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# व्यापक हिताचे कामगार कायदे

आपल्याकडे अशी पद्धती आहे की सरकारने कोणतीही नवीन सुधारणा आणण्याचा प्रयत्न केल्यास विरोधी पक्षांनी आपल्या विरोधी धर्माप्रमाणे त्याला विरोध केलाच पाहिजे. परंतु बरेचदा हा विरोध विरोधाकरिता असतो. अनेक संघटना या आपली दुकानदारी चालली पाहिजे, कामगारांचे प्रश्न जिवंत राहिले, तरच आम्ही जिवंत राहू, या भावनेतून सुद्धा अनेक गोष्टींना विरोध करीत असतात. प्रत्येक सुधारणेमध्ये काही ना काही त्रुटी निश्चित असू शकतात; त्या त्रुटी दाखवून देणे आणि नुसत्या त्रुटी दाखवून न देता त्यावर उपाय काय हे सांगून कामगारांचे व्यापक हित साधणे ही खरे पाहिले तर कामगार संघटनांची व कामगार नेत्यांची जबाबदारी असते. परंतु अनेक वर्षांपासून येथील राजकीय पक्षांना हे माहीत आहे की या देशातील कोट्यवधी कामगार ही त्यांची मतपेढी सुद्धा आहे. त्यामुळे आपल्या राजकीय पक्षाचं हित साध्य झालं पाहिजे व समाजामध्ये कुठल्या ना कुठल्या निमित्ताने अस्थिरता कायम राहून, आम्ही कसे कामगारांचे खरे हितैषी आहोत असे दाखवत सुधारणांना विरोध करण्याचे धोरण अवलंबिले जाते. काही वर्षांपूर्वी शेतकरी कायदे आले होते; त्याला सुद्धा इतका प्रचंड विरोध करण्यात आला की शेवटी सरकारला ते परत घ्यावे लागले. संपूर्ण देशभरामध्ये नव्हे तर जगभरामध्ये सरकारची नाचक्की होईल अशा पद्धतीचे अनेक प्रयत्न विरोधी पक्ष आणि अनेक नेत्यांकडून करण्यात आले. मग यामध्ये निश्चितपणे सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये प्रश्न निर्माण होतो की लोकांनी निवडून दिलेले जे सरकार आहे, त्या सरकारला सुद्धा पुन्हा निवडून यायचं आहे; मग ते सरकार इतक्या कोट्यवधी लोकांच्या अहिताचा निर्णय कसा काय घेऊ शकेल? दोन-चार लोकांना, म्हणजे दोन-चार उद्योगपतींना खुश करण्यासाठी जर कोट्यवधी लोकांची मतपेढी आपण खराब करणार असेल, तर आपला पक्ष पुढल्या काळात निवडणुकीला सामोरा जाऊ शकत नाही व निवडूनही येऊ शकत नाही. हे सत्य त्या सरकारला निश्चितच माहीत असते. त्यामुळे या आरोपांमध्ये काही तथ्य नाही की कामगार कायदे हे दोन-चार लोकांना खुश करण्यासाठी निर्माण केले गेलेले आहेत.

ही गोष्ट सत्य आहे की उद्योगपती हे प्रचंड लक्ष्मी संपन्न असतात, त्यामुळे ते कोणत्याही गोष्टी विकत घेऊ शकतात, ते न्यायाला सुद्धा प्रभावित करण्याचा प्रयत्न करू शकतात. परंतु त्यांची ही परिस्थिती लक्षात घेऊन कामगारांच्या व्यापक हिताचा विचार सरकारने करणे गरजेचे असते.

नुकतेच जे कामगार कायदे मोदी सरकारने आणलेले आहेत, त्यामध्ये कामगारांच्या व्यापक हिताचा विचार केला गेला आहे असे म्हणावेसे वाटते. देशामध्ये जवळपास ५० कोटी कामगार आहेत. यापैकी ९० टक्के म्हणजे ४५ कोटी कामगार हे असंघटित क्षेत्रात काम करणारे आहेत. या असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांना भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी विमा, निवृत्ती अनुदान इत्यादी सुविधा नव्हत्या. देशामध्ये अनेक कामे हंगामी स्वरूपाची असतात. उदाहरणार्थ, फटाका उद्योग, दिवाळीनिमित्त मिठाई तयार करण्याचे काम अशा पद्धतीचे विविध सणांच्या निमित्ताने तसेच जागतिक बदलांचा अंदाज घेत अनेक वेळा कारखान्यांना मनुष्यबळाची कमी-जास्त प्रमाणात उपलब्धता लागत असते. अशा वेळेस काम करणारे कामगार हे काही काळाकरिता रोजंदारीवर काम करायचे आणि नंतर त्यांना काम संपल्यावर मुक्त केले जायचे. मग ते दुसरीकडे दुसरे काम शोधण्यासाठी जायचे, असा प्रकार होता. परंतु आता सरकारने असे धोरण बनविले आहे की अशा कामगारांना ठरावीक कालावधीसाठी घेऊ शकता, परंतु त्यांनाही भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी विमा, निवृत्ती अनुदान हे फायदे देण्याचे ठरविले आहे. अनेक वेळा पाच वर्ष काम केल्याशिवाय निवृत्ती अनुदान मिळत नव्हते; आता ते कमी कालावधीसाठी सुद्धा मिळू शकणार आहे. यापूर्वी कमी कालावधीसाठी काम करणाऱ्या लोकांचा भविष्य निर्वाह निधी कापला जात नव्हता, परंतु आता तो सुद्धा लागू केला जाणार आहे. म्हणजेच अस्थायी कर्मचाऱ्यांना सुद्धा स्थायी कर्मचाऱ्यांसारखे लाभ मिळू शकणार आहेत.

आपल्याला माहीत आहे की आता ई-कॉमर्सचे जग आहे; नवनवीन ई-प्लॅटफॉर्म दररोज येत आहेत. स्विगी, झोमॅटो, ब्लिनकीट यासारख्या अनेक कंपन्या ग्राहकांना घरपोच सेवा देण्याचे काम करत आहेत. यांच्यासाठी काम करणारे डिलिव्हरी बॉय, म्हणजे गिग वर्कर्स, यांना कुठलीही सुरक्षा नव्हती. त्यांना कोणीही कामावर ठेवू शकत होते किंवा काढून टाकू शकत होते. त्यांना भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी विमा, निवृत्ती अनुदान, इतर सर्व सुविधा नव्हत्या. आता नवीन कामगार कायद्याने त्यांना त्या सुविधा मिळणार आहेत.

महिलांना अनेक ठिकाणी कमी वेतन दिले जात होते. आता महिला आणि पुरुष यांना समान वेतन देण्याचे कायद्याने बंधनकारक केलेले आहे. पूर्वी अनेक कंपन्या दोन-दोन महिन्याचे पगार थांबवून ठेवायच्या व देताना एकच पगार द्यायच्या. आधीचे पैसे पाहिजे असल्यास पुन्हा काम करीत राहा, हाच पर्याय कामगारांसमोर असायचा. परंतु आता निश्चित दिवसांमध्ये दर महिन्याला पगार करणे कंपन्यांना बंधनकारक केले गेले आहे. पूर्वी अनेक कंपन्या महिलांना कामावर यासाठी ठेवत नव्हत्या की त्या शिफ्ट ड्युटी म्हणजे प्रथम, द्वितीय, तृतीय पाळीमध्ये काम करू शकत नाहीत. परंतु आता सरकारने महिलांना सुद्धा या सर्व कामाच्या वेळांमध्ये काम करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे महिला त्यांच्या सुरक्षेची पूर्ण व्यवस्था सुनिश्चित झाल्यानंतर कंपनीमध्ये रात्रपाळीत सुद्धा काम करू शकतील.

एका उद्योगाने मला सांगितले की, आम्ही शंभर लोक कामासाठी एका ठिकाणी जाऊन घेऊन आलो होतो, परंतु काही दिवसात शंभरही लोक अचानक सोडून गेले. अशा पद्धतीची कामगारांची पळवा-पळवी सुद्धा सुरू असते. जर उद्योगाने कामगारांना पगारासहित सर्व लाभ देऊ केले, तर कामगार सुद्धा एका ठिकाणी थांबून काम करतील. त्यामुळे कामगारांचे प्रशिक्षण, त्यांना शिकवाव्या लागणाऱ्या सर्व गोष्टी याच्यावरचा खर्च उद्योगांचा कमी होईल. कामगार एकाच ठिकाणी दीर्घकाळ काम करू शकतील. ठरावीक कालावधीसाठी कामगारांना घेता आल्यामुळे उद्योगांचाही फायदा होईल. आपल्याला किती कालावधीसाठी काम मिळालेले आहे हे कामगाराला माहीत राहील. त्यानंतर जर त्याला नवीन काम शोधायचे असेल, तर तो आधीपासूनच त्याची तयारी करू शकेल. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की या कामगारांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असते, व्यसनाधीनता सुद्धा अधिक असते. यांना भडकवणारे नेते मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. या सर्व प्रकारांमुळे अनेक वेळा कधी नेत्यांकडून त्यांची दिशाभूल केली जाते, तर कधी ठेकेदारांकडून त्यांचे आर्थिक शोषण केले जाते. या सर्व पृष्ठभूमीवर, नवीन कामगार कायद्यांमुळे कामगारांना भारतभर कुठेही समान सुविधा, समान हक्क मिळू शकतील. गावामध्ये अधिक पैसे मिळत नाही म्हणून त्यांना शहरामध्ये जावे लागायचे, परंतु आता गाव-खेड्यातील व शहरातील उद्योगांना सारखेच नियम राहणार आहेत. सरकारची नीती व नियत दोन्ही कामगारहिताची दिसून येत आहे, त्यामुळे या कायद्यांचे स्वागतच केले पाहिजे असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## चित्रपट, कलाकार आणि समाजभान...

चित्रपट हे केवळ कलेचे माध्यम नसून त्याचा समाज, संस्कृती आणि विचारसरणीवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडतो. चित्रपटातील अभिनेता-अभिनेत्री यांना प्रेक्षक आपला आदर्श मानतात. विशेषतः तरुण पिढीवर त्यांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे चित्रपट निर्मात्यांनी समाजाला योग्य दिशा देणारे तसेच धार्मिक व ऐतिहासिक चित्रपटांमध्ये सत्यता पडताळूनच निर्मिती करावी. मात्र अलिकडच्या काळात काही चित्रपटांमध्ये देवी-देवतांचे चुकीच्या, विकृत किंवा विनोदी स्वरूपात चित्रण केले जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे देव-देवतांचा अपमान तर होतोच, पण धार्मिक भावना देखील दुखावल्या जातात. केवळ चित्रपटच नव्हे, तर अभिनेता-अभिनेत्री यांनीही त्यांच्या वागणुकीतून कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत, याचे भान ठेवायला हवे. नुकताच गोवा येथे पार पडलेल्या ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोप सोहळ्यात अभिनेता रणवीर सिंहने कांतारा - चॅप्टर १ या कन्नड चित्रपटातील देवीच्या अवताराची रंगमंचावर नक्कल केली आणि कोटीतुलु समाजातील पवित्र दैवत श्री चामुंडा देवीबद्दल अपशब्द काढले. लोकशाहीत प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे; परंतु कोणाच्याही भावना दुखावणे, धार्मिक तेढ निर्माण करणे तसेच समाजात तणाव निर्माण होईल असे वक्तव्य करणे हे नैतिक आणि सामाजिकदृष्ट्या अयोग्य आहे. म्हणून सामाजिक भान ठेवून, कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत, अशी जबाबदारी चित्रपट निर्माता, कलाकार यांनी स्वीकारावी आणि समाजाला योग्य दिशा देण्याचे कर्तव्य पार पाडावे.

**ॲड. वैशाली परांजपे**/नागपूर

## वाचक पत्रे

### मुलींनो, बायोडेटात स्पष्ट लिहा

बरेली येथील न्यायाधीश ज्ञानेंद्र त्रिपाठी यांनी मुलींना स्पष्ट सांगितले की, तुम्हाला सासू-सासरे नको असल्यास लग्नाच्या बायोडेटात तसे स्पष्ट लिहा. सध्या विवाह हे विवाह संस्थेतून जमतात. तेथे एक फॉर्म भरून द्यावा लागतो. त्यात तुमच्या अपेक्षा स्पष्टपणे लिहाव्या लागतात. पूर्वीपेक्षा आजच्या उपवर मुलींचे जीवन जास्त सुखकर व त्यांच्या मागणीचा विचार केला जातो. आज सर्वच क्षेत्रांत भारतीय स्त्रीने मानाने स्थान मिळवले आहे. आर्थिक बाबतीत स्वयंसिद्धा आहे. बहुतेक कायदे जसे घटस्फोट, पोटगी, मुलाला नकार देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. पूर्वी मुलीचे आई-वडील तिला सांगत की, आता सासर हेच तुझे सर्वस्व आहे. "उभ्याने गेली आडव्याने निघ" ही अतिशयोक्ती असेल परंतु, आजचे वडील, आई सुद्धा सासू-सासरे नको याला दुजोरा देतात. त्यांना पण मुलगा आहे हे लक्षात घ्या. काही स्वार्थी लोक "काम सरो वैद्य मरो"प्रमाणे मतलबी असतात. उतार वयात त्यांना घरातून हाकलून देतात किंवा वृद्धाश्रमात ठेवतात. मुलाने म्हातारपणी आई-वडिलांना सांभाळावे असा कायदा आहे. अनेक आई-वडिलांना हे माहीत असते परंतु न्याय मागत नाही. पुत्र प्रेमाने धृतराष्ट्र झालेले असतात. एकीकडे सासू-सासरे नको म्हणतात दुसरीकडे सासऱ्याच्या इस्टेटीत हिस्सा मागतात. हे योग्य नाही. त्यांना कुठलीही संपत्ती घेण्याचा अधिकार नाही. तसा कायदा व्हावा. ज्यांना सासू-सासरे नको त्यांनी कुणाशीही लग्न करावे. त्यांना कुळ, जात, धर्म माहीत नसतो, त्यांना कुठलीही कौटुंबिक पार्श्वभूमी राहणार नाही. भारतीय संस्कृतीचा पाया असलेल्या युवतींच्या या मागणीमुळे भारतीय कुटुंब पद्धती नाश पावेल. कायद्यानेच याला आवर घालावा.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-६६

सोमवार, ८ डिसेंबर २०२५

### संघ हीच जीवनगाथा जगतास देउ मानवता

संघ हीच जीवनगाथा, जगतास देउ मानवता ॥ धृ.॥

ज्या अहंकारकोषात कोंडून पडे पुरुषार्थ
तो कोष दुभंगुनी होत हे विशाल जीवन आता ॥१॥

प्रांतांच्या सीमा पुसुनी भाषांचे भांडण मिटुनी
अभिमाने मन रसरसुनी प्रगतीच्या धरिल्या वाटा ॥२॥

संकटे आजवरि आली, थांबवू न आम्हा शकली
ती अखेर सारी थकली, नमविला तयांनी माथा ॥३॥

हा पथ धरिला ऐक्याचा, यशदायी जो विभवाचा
तो कधी न सोडायाचा, संकल्प एक हा आता ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तामलवाडी पोलिसांचा सनराईज स्कूलला भेटी दौरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

पोलिस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत तामलवाडी पोलिस ठाण्याच्या पथकाने दि. ६ डिसेंबर रोजी सनराईज स्कूल, तामलवाडी येथे भेट देत विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

सदर भेटीत तामलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकुर, महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस हवालदार पंडीत शिंदे, नितीन मुळे, सायबर पोलीस ठाण्याचे पोअं. मकसुद काझी, नितीन भोसले, गोपाल सलगर, उमेश माने तसेच मपोहेकॉ कोरे सहभागी होते.

विद्यार्थ्यांना पोलिसांविषयी समज-गैरसमज, वाहतुकीचे नियम, बाललैंगिक अत्याचार, भारतीय न्याय संहिता व पोक्सो कायद्यातील बालकांच्या सुरक्षेबाबतची कलमे, व्यसनमुक्ती, गुड टच-बॅड टच, डायल ११२, सायबर गुन्हे आणि सोशल मीडियावरील सुरक्षितता या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे समुपदेशनही करण्यात आले.

या उपक्रमात सनराईज स्कूलचे सुमारे ८०० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### संगीतकार व गायक अजय गोगावले यांनी सहकुटुंब घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**तुळजापूर, दि.७ डिसेंबर -**

भारतीय संगीतविश्वातील लोकप्रिय संगीतकार अजय-अतुल या जोडगोळीतील गायक अजय गोगावले यांनी आज सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. अजय गोगावले यांची परंपरागत रीतीरिवाजांनुसार पुजारी सचिन अमृतराव यांनी देवीचे कुलधर्म कुलाचार पुजा केली. त्यांनतर गोगावले कुटुंबीयांनी श्री तुळजाभवानी देवीची ओटी पुजाऱ्यांच्या हस्ते भरून देवीची आरती करत मनोभावे देवींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने यांनी श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा व महावस्त्र भेट देत अजय गोगावले यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी अर्जुन चौधर, अनुप ढमाले, रामेश्वर वाले, अनिरुद्ध देशपांडे, दिनेश निकवाडे, विक्रम कदम, नवनाथ खिंडकर तसेच मंदिर संस्थानचे अन्य कर्मचारी उपस्थित होते.



### दिव्यांग विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

जागतिक दिव्यांग सप्ताह निमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान करण्यात आला. जागतिक दिव्यांग सप्ताहात समावेशीत शिक्षण विभागाकडून मोफत वाटप करण्यात आलेल्या अलीम्को साहित्या मधील व्हीलचेअर व अध्ययन अध्यापन साहित्याचे किटच्या वापराबद्दल पालक व शिक्षक यांना कास्ती केंद्राचे केंद्रस्तरीय विशेष शिक्षक प्रकाश लांडगे यांनी माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना विशेष शिक्षक प्रकाश लांडगे यांनी हा दिवस फक्त औपचारिकता नाही, तर समाजातील दिव्यांग विद्यार्थ्याविषयी आदर, संवेदना आणि समानतेचा संदेश देणारा दिवस आहे. यावेळी मुख्याध्यापक सुरेश वाघमोडे, रमेश खटके, युवराज बनकर, कैलास माणिकशेट्टी, वर्षा चौधरी, महानंदा राठोड आदी उपस्थित होते.



### स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती साजरी

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

बालाजी नगर येथील स्वातंत्र्य सैनिक कॉलनीतील श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंतीनिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर दरम्यान गुरुचरित्र पारायण, भजन, प्रवचन, कीर्तन आणि महाप्रसाद यांसारखे विविध कार्यक्रम पार पडले. दि.४ डिसेंबर रोजी सुनील विटकर व विनायक जाधव यांच्या हस्ते यज्ञपूजा, स्वामी समर्थ महाराजांची नगर प्रदक्षिणा व हभप पूजाताई कुंभार महाराज (बारामती) यांचे कीर्तन झाले. महिलांच्या भजनी मंडळाने भजन सेवा केली. सायंकाळी दिनेश बंडगर यांनी आरती केली तर प्रजापती विष्णू प्रभू यांनी प्रवचन दिले. कार्यक्रमासाठी यशवंत सोनटक्के, संतोष क्षीरसागर, ओंकार वायकर आदींनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहिल्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

## तुळजापूरमध्ये ‘कोण होणार नगराध्यक्ष?’; पैजा लावण्यात नागरिक व्यस्त



### भाजप विरुद्ध काँग्रेसच्या दुरंगी लढतीवर नागरिकांचा कयास...

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.७ डिसेंबर -**

तुळजापूर नगरपरिषद निवडणुकीतील अटीतटीच्या लढतीत भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद गंगणे आणि काँग्रेसचे उमेदवार अमर मगर यांच्यात चुरस निर्माण झाली असून नगरपरिषदेत कोणाचा झेंडा फडकेल याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. शहरातील नागरिकांमध्ये निकालावरून तर्क-वितर्क रंगले असून अनेक ठिकाणी ‘कोण जिंकणार?’ यावर पैजा लावण्यापर्यंत वातावरण तापले आहे.

शहरातील प्रत्येक चौकात नागरिकांचे घोळके जमून निकालाबाबत चर्चेला उधाण आले आहे. मागील पंधरा वर्षातील विकासकामे, भ्रष्टाचाराच्या चर्चा, तसेच पुढील राजकीय समीकरणांवर जोरदार चर्चा नागरिक करताना दिसत आहेत. दोन्हीही प्रमुख उमेदवार प्रचंड आत्मविश्वासात असल्याने मीच जिंकणार असे ठाम विधान दोन्हीकडून करण्यात येत आहे.

नगरपरिषदेत ११ प्रभागांसाठी २२ नगरसेवक निवडून येणार असून सर्वच प्रभागांमध्ये समान चुरस पाहायला मिळत आहे. त्यामुळे



नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांच्या उमेदवारांमध्ये धाकधूक स्पष्टपणे जाणवत आहे. प्रभाग क्रमांक ३, ५, ७, ८, ९ आणि १० मध्ये तर विशेषतः काट्याची टक्कर झाल्याचे मतदारांमध्ये बोलले जात आहे.

अनेक प्रभागांत क्रॉस वोटिंग झाल्याची चर्चा सुरू असून त्यामुळे निकाल अपेक्षेपेक्षा धक्कादायक येण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. दररोज नागरिक वेगवेगळे अंदाज वर्तवत असून एकमताने कोणाच्याही बाजूने निकाल लागेल असे ठामपणे सांगता येत नाही.

प्रचार काळात भाजप आणि काँग्रेस दोन्ही पक्षांनी जोरदार मोहीम राबवली. मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवारांनी विविध उपाययोजना केल्या.

दिवसरात्र मेहनत घेत प्रचार झोकात सुरू होता. मतदानानंतर भाजप कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून उत्साह व्यक्त केला असला, तरी काँग्रेसने यावर टीका करत भुतावळेपणा न करता निकालानंतर गुलाल आम्हीच उधळणार असा विश्वास व्यक्त केला.

आता २१ डिसेंबरच्या निकालानंतरच गुलाल कोण उधळणार आणि विजयाचा तुरा कोणाच्या माथी मिरवणार हे स्पष्ट होणार आहे.

तोपर्यंत तुळजापूरमध्ये राजकीय चर्चा अधिकच रंगत जाणार हे निश्चित. भाजपने २२ प्लस एक आमचाच विजय असा दावा करीत आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

### सर्व उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये कैद

नगराध्यक्ष पदासाठी ७ उमेदवार, तर ११ प्रभागांसाठी ६२ नगरसेवक उमेदवार रिंगणात होते. प्रभाग क्रमांक ३ मध्ये भाजपचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने आता ६२ पैकी २२ आणि नगराध्यक्ष पदासाठी ७ पैकी एक उमेदवार २१ डिसेंबर रोजी निवडून येणार आहे.

## तेरा वर्षांनंतर नरसिंह साखर कारखाना पुन्हा सुरू

### वाशी तालुक्यात आनंदाची लाट...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात राष्ट्रीय महामार्गालगत असलेला नरसिंह साखर कारखाना मागील तेरा वर्षांपासून बंद अवस्थेत होता. दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर ८ डिसेंबर रोजी कारखान्याची धुराडी पुन्हा पेटणार असल्याची माहिती सावंत ग्रुपकडून देण्यात आली आहे.

माजी मंत्री व परंडा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार तानाजी सावंत यांच्या भैरवनाथ ग्रुपने हा कारखाना कायमस्वरूपी खरेदी करून कार्यान्वित केला आहे. कारखाना बंद असल्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. तसेच परिसरातील रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात घटल्या होत्या. कारखाना सुरू झाल्याने आता ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार, वाहनधारक, तसेच स्थानिक व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिसरातील आर्थिक चक्राला पुन्हा गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आठ डिसेंबर रोजी भैरवनाथ ग्रुपचे चेअरमन अनिल सावंत यांच्या शुभहस्ते कारखान्याच्या प्रथम हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदीपन सोहळा पार पडणार आहे.

## नळदुर्गातील मैलारपुरात तिसऱ्या खेट्याला भाविकांची गर्दी

### ‘येळकोट जय मल्हार’च्या गजरात दर्शनासाठी रांगा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ डिसेंबर -**

‘येळकोट, येळकोट जय मल्हार!’च्या गजरात नळदुर्ग (मैलारपुर) येथे रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी तिसऱ्या खेट्याला श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

पावणेदोन महिन्यांच्या पारंपरिक वास्तव्यासाठी श्री खंडोबा देव श्रीक्षेत्र मैलारपुर येथे आल्यानंतर दर रविवारी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. त्यानुसार तिसऱ्या खेट्यालाही पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरम्यान, भाविकांकडून दंडवत घालणे, बाशिंग चढविणे, नैवेद्य दाखविणे, विविध नवस फेडणे, तसेच मंदिरावर खोबरे आणि भंडारा उधळण्याचा



धार्मिक सोहळा उत्साहात पार पडला. यंदाची वार्षिक श्री खंडोबा यात्रा दि.२ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत श्रीक्षेत्र मैलारपुर येथे होणार आहे.

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा राज्यांतून तब्बल ५ ते ६ लाख भाविक या यात्रेला हजेरी लावतात. यात्रेपूर्वी दर रविवारी मैलारपुर परिसरात ‘मिनी यात्रा’सदृश वातावरण निर्माण होत आहे.

स्थानिक नळदुर्ग शहर व परिसरातील भाविक सुद्धा मोठ्या संख्येने दर्शनासाठी येथे दाखल होत आहेत. दर रविवारी श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टतर्फे भाविकांसाठी अन्नदान आयोजित केले जाते.

## परंडा तालुक्यात गोवंश बेकायदेशीर वाहतूक

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

देवगाव रोड, परंडा येथे बेकायदेशीररीत्या गोवंशाची वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीस ताब्यात घेतले. आरोपी गौस अब्बास कुरेशी (वय २७) हा दि.६ डिसेंबर रोजी रात्री ९.५० वाजता जिकिरे यांच्या पडीक जमिनीतून कुर्डुवाडी रोडकडे विना नंबर पिकअप वाहनाने गोवंश वाहतूक करताना आढळला. वाहनातून गोवंशीय जातीचे २ वासरे व १ जर्सी गाय असा एकूण किंमत २,३५,००० रुपये मालमत्ता मिळून आली.

## भैरवनाथ शुगर कारखान्याकडून ऊस उत्पादकांना २८०० रुपये पहिली उचल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तांदूळवाडी येथील भैरवनाथ शुगर कारखान्याने चालू गाळप हंगाम २०२५-२६ साठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रती मे.टन २८०० रुपये पहिली उचल जाहीर केली आहे.

हा निर्णय माजी मंत्री व आमदार तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून घेण्यात आल्याची माहिती चेअरमन अनिल सावंत व व्हाईस चेअरमन विक्रम सावंत यांनी दिली.



कारखान्याचा गाळप आज अखेर ५७,२९५ मे.टन इतका झाला असून गाळप प्रक्रिया वेगाने सुरू आहे. शेतकऱ्यांचा एकही टन ऊस न शिल्लक ठेवता पूर्ण गाळप करण्याचे कटिबद्ध आश्वासन व्यवस्थापनाने दिले आहे.

## यशोदाबाई पाटील हायस्कूलमध्ये जागतिक दिव्यांग सप्ताह साजरा



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.७ डिसेंबर -**

लोहारा तालुक्यातील नागुर येथील यशोदाबाई पाटील हायस्कूल येथे जागतिक दिव्यांग सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कास्ती केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक सुदर्शन जावळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख मोहन शेवाळे व केंद्रस्तरीय विशेष शिक्षक प्रकाश लांडगे उपस्थित होते

कार्यक्रमादरम्यान समावेशीत शिक्षण विभागाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या विविध सेवा, सुविधा व साहित्याविषयी पालक आणि शिक्षकांना माहिती देण्यात आली. शाळेतील दिव्यांग विद्यार्थी प्रथमेश घोडके याला अलीम्को साहित्यामधील व्हीलचेअर आणि अध्ययन-अध्यापन साहित्याचे किट मोफत देण्यात आले. या साहित्याच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन विशेष शिक्षक लांडगे यांनी केले. दिव्यांग व्यक्तींना समान संधी, सहभाग आणि समाजात संवेदनशीलता वाढवणे हे त्यामागचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक तानाजी जाधव, सहशिक्षक अनिल गाडेकर, दत्ता राठोड, व्यंकट शिंदे तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकट शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक तानाजी जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले.

## महावितरणमध्ये प्रीतम गव्हाणे यांची निवड; ‘जयप्रकाश’मध्ये सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**



जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील माजी विद्यार्थी प्रीतम चंद्रकांत गव्हाणे यांची महावितरण (विद्युत) विभागात विद्युत सहाय्यक पदावर नियुक्ती झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष दादा कोळगे, माजी जि. प. सदस्य रामदास अण्णा कोळगे, माजी ग्रा. प. सदस्य राजनारायण कोळगे, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश शेटे यांनी मानले.

## अविष्कार कला ग्रुपची आरळी बुद्रुक येथे रंगतेय हौशी गायकांची मैफिल

### स्थानीक कलाकारांनी सुरू केलेल्या उपक्रमातून शेकडो गायकांना मिळाला मंच...

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

ग्रामीण भागातील हौशी गायकांसाठी संधीचे व्यासपीठ ठरलेला अविष्कार कला ग्रुप आता वेगाने वाढत असून या उपक्रमामुळे शेकडो नवोदित गायकांना त्यांच्या कलेचा परिचय जगासमोर करून देण्याची संधी मिळत आहे. तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथे सुरू झालेली ही दैनंदिन ऑनलाइन मैफल ग्रामीण संगीतविश्वात लक्षवेधी ठरत आहे.

आरळी बुद्रुक मधील प्रगतशील शेतकरी असणारे प्रशांत व्हरकट, दादा उळेकर, भीमराव गवळी, विकास ज्योत आणि रवी उळेकर या कलाप्रेमिंनी एकत्र येत गावात छोट्या स्वरूपात मैफिलींची सुरूवात केली. मुबंई सारख्या कलानगरीत गावचे भुषण असणारे प्रसिद्ध आर्ट डिझायनर खाजाभाई सय्यद दैनंदिन या ग्रुपला साथ आणि प्रोत्साहन देत असतात. स्वतः ही ऑनलाईन पद्धतीने सहभागी असतात. मात्र या छोट्या उपक्रमाचा आज मोठा कलाविष्कार झाल्याचे पाहायला मिळत आहे.

> आरळी सारख्या ग्रामीण भागात दररोज सादर होणाऱ्या विविध गीतप्रकारांमुळे भावगीत, भक्तिगीत, सुगम संगीत, मराठी-हिंदी फिल्मी गीते श्रोते या मैफिलीशी घट्टपणे जोडले जात आहेत. वॉट्सअप, फेसबुक, युट्युब ऑनलाईनच्या माद्यमातून जोडलेले असंख्य चाहते मेसेज करून दाद देत आहेत. ग्रामीण भागातील हौशी कला अशाप्रकारे जपली आणि पुढे नेली जात आहे ही मोठी गोष्ट आहे.ऑनलाईन श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हीच बाब ऊर्जात्मक आहे.
>
> **- खाजाभाई सय्यद,** प्रसिद्ध आर्ट डिझायनर तथा अविष्कार कला ग्रुप सदस्य मुबंई

त्यांच्या प्रयत्नांमुळे सुरू झालेल्या या मैफिलीचा प्रवास सध्या इतका विस्तारला आहे की जवळपास शेकडो हौशी गायकांना या माध्यमातून ऑनलाइन आणि प्रत्यक्ष सादरीकरणाचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. दहा वर्ष वयाच्या मुलांपासुन ते ६५ वर्षापर्यंतचे नागरिक या स्टुडिओत जाऊन गीत गात आहेत. सुरुवातीला फक्त आरळी बुद्रुकमध्ये मर्यादित असलेला हा उपक्रम काही महिन्यांतच अणदूर, धाराशिव, तुळजापूर, उमरगा, सोलापूर आणि मुंबईपर्यंत पोहोचला आहे. मुंबईसह विविध शहरांतील कलाकार प्रत्यक्ष आरळी बुद्रुक येथे येऊन आपली कला सादर करत आहेत, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरत आहे.


या उपक्रमामुळे हौशी कलाकारांना स्टेज शेअर करण्याची संधी मिळत आहे. आत्मविश्वासाने नवीन गाण्यांची प्रॅक्टिस, विविध शहरांतील कलाकारांशी संवाद करायला मिळत असून नवोदितांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

प्रेक्षकवर्ग वाढण्याचा फायदा या हौशी गायकांना होत असून अनेक छोट्या छोटया कार्यक्रमात गीत गायन अशा अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. काही जिद्दी कलावंतांच्या पुढाकारातून सुरू झालेला छोटासा गायन उपक्रम आता शेकडो हौशी गायकांना उज्वल भविष्याची संधी देणारा ‘अविष्कार’ ठरत आहे.

### दैनंदिन फर्माईश गीतांची ऑनलाइन प्रस्तुती...

या ग्रुपने सुरू केलेल्या ऑनलाइन फर्माईश गीताच्या मैफिलीत दररोज विविध गायक आपल्या आवाजाची जादू सादर करतात. फेसबुक लाइव्ह, यूट्यूब आणि व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून ही गायन मैफल नियमितपणे सादर केली जाते. श्रोत्यांकडून येणाऱ्या फर्माईशींमुळे प्रत्येक दिवस नवनव्या गाण्यांनी रंगतो आणि यामुळे कलाकारांच्या गाण्यांची व्याप्ती व आवाका अधिक वाढताना दिसतो.





## ८० हजारांचा कॉपर वायर लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

नांदुर्गा शिवारातील मे रिन्यु ग्रीन एनर्जी एम.एच.एस.-०३ प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतून अज्ञात व्यक्तीने सुमारे ८० हजार रुपये किमतीचा कॉपर वायर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

दि.२ डिसेंबर रोजी रात्री १ ते पहाटे ६ वाजेदरम्यान ही घटना घडली. चोरट्याने ४x केबल १६० मीटर, ईयहिंग केबल २५ मीटर असे साहित्य लंपास केले.

या प्रकरणी सिक्युरिटी सुपरवायझर विशाल आशोक तनमोर (वय ३३, रा. धुत्ता) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि.६ डिसेंबर रोजी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

# हिंस्त्र श्वापदाने पाडला सात शेळ्यांचा फडशा ; डोंगर पिंपळा परिसरात दहशत

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ डिसेंबर**

अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा शिवारात एका अज्ञात हिंस्त्र श्वापदाने मोठा हाहाकार माजवला आहे. रविवारी रात्री या श्वापदाने एका शेतकऱ्याच्या गोठ्यात घुसून तब्बल सात शेळ्यांना ठार केले. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे १ लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झाले असून, परिसरात प्रचंड दहशत पसरली आहे.

डोंगर पिंपळा येथील शेतकरी बळीराम बाबुराव केंद्रे हे ज्या शेतात वहीत करतात, तिथेच त्यांनी शेळी पालनासाठी शेड उभारले आहे. केंद्रे यांच्याकडे सहा मोठ्या शेळ्या आणि एक लहान पिल्लू असे एकूण सात पशुधन होते. रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता त्यांनी शेळ्यांना चारापाणी केले आणि ते झोपण्यासाठी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात हिंस्त्र श्वापदाने त्यांच्या शेडवर हल्ला केला. या हिस्त्र श्वापदाने गोठ्याच्या संरक्षणासाठी लावलेल्या सहा फूट उंचीच्या जाळीवरून सहज उडी मारून आत प्रवेश केला. आत शिरताच त्याने सातही शेळ्यांना ठार मारून त्यांचा फडशा पाडला. सोमवारी पहाटे ५ वाजता सुमारास ही घटना उघडकीस आल्यानंतर बळीराम केंद्रे यांना धक्का बसला. यामध्ये त्यांचे सुमारे १ लाखांहून अधिक रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाने पंचनामा केला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रतन तळेकर आणि डॉ. अभिषेक अबुज यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृत शेळ्यांचे शवविच्छेदन केले. या घटनेमुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये मोठी भीतीचे वातावरण आहे. वनविभागाने तातडीने या हिस्त्र श्वापदाचा शोध घेऊन बंदोबस्त करावा, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी डोंगर पिंपळा येथील ग्रामस्थांनी केली आहे.



# परळीच्या ओंकार (वैद्यनाथ) साखर कारखान्याकडून ऊस दर जाहीर

## शेतकऱ्यांच्या ऊसाला प्रति. मे. टनाला मिळणार ३०५० रुपयांचा दर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**


दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी स्थापन केलेल्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे रूपांतर आता ओंकार साखर कारखान्यात झालेले आहे. कारखान्याच्या यावर्षीच्या गळीत हंगामात ऊस उत्पादकांना ३०५० रुपये दर जाहीर करण्यात आला आहे. या अनुषंगाने पहिला हप्ता २९५० प्रति मे. टन दराने शेतकऱ्यांना मिळणार आहे. याबाबतची अधिकृत घोषणा कारखाना प्रशासनाने आज पत्रकार परिषद घेऊन केली आहे.

चेअरमन बाबुरावजी बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट क्र. ८ पांगरी ता. परळी वैजनाथ जि. बीड कारखाना व्यवस्थापनाने गळीत हंगाम २०२५-२०२६ साठी गाळपास येणाऱ्या ऊसाचा दर निश्चित केला आहे. यंदाच्या हंगामासाठी कारखान्याकडून प्रति मे. टन रु. ३०५०/- दर जाहीर करण्यात आलेला आहे. गळीतास येणाऱ्या ऊसाला पहिला हप्ता रुपये २९५०/- प्रति मे. टन व दीपावली सणासाठी दुसरा हप्ता रुपये १००/- प्रति मे. टन दर देण्याचा निर्णय कारखाना व्यवस्थापनाने घेतलेला आहे. तसेच ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना हंगाम २०२५-२६ मध्ये गळीतास आलेल्या ऊसाच्या टनेजनुसार कारखाना धोरणाप्रमाणे दीपावली सणानिमित्त मोफत साखर वाटप करण्यात येईल अशी माहिती कारखान्याचे जनरल मॅनेजर वैभव व्ही. काशीद यांनी दिली.

कारखान्यास ऊस पुरवठादार, शेतकरी यांचे सहकार्य आणि विश्वास नेहमीच कारखान्यासोबत राहिल. यापुढेही आपला कारखाना आपल्या हितासाठी सर्वोत्तम निर्णय घेण्यास तत्पर राहील अशी ग्वाही ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट क्र. ८ पांगरी ता. परळी यांनी दिली आहे.

# राज्य स्तरीय ब्राह्मण महा अधिवेशनास जिल्ह्यातील ब्राह्मण समाजाने हजर राहावे– अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ डिसेंबर**





सर्व ब्राह्मण समाजाचे अधिवेशन १ फेब्रुवारी २०२६ रोजी ९ ते ७ या वेळेत मंथन हॉल, बीड बायपास ,येथे एमआयटी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे ब्राह्मण अधिवेशन आयोजित केले आहे. अशी माहिती स्वागत अध्यक्ष सचिन वाडे पाटील यांनी दिली आहे.

या बैठकीत विजय काजे, संदेश देशपांडे, संतोष जोशी, विवेक जोशी, काशिनाथ चांदजकर, महेश कुलकर्णी, रवींद्र पंडित, धनंजय नारळे, संतोष कुलकर्णी, जितेंद्र तरटे, प्रवीण खणाळे, रेणुका दास कुलकर्णी आदि मान्यवर उपस्थित होते.

या अधिवेशनास उद्योजक, विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

तरी समाजातील सर्व ब्राह्मण समाजाने राज्यस्तरीय अधिवेशनास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे असे आवाहन स्वागत अध्यक्ष सचिन वाडे पाटील यांनी केले आहे. तरी ब्राह्मण अधिवेशनास बीड जिल्ह्यातील सर्व ब्राह्मण समाजाने जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय पेशवा संघटना बीड यांच्यावतीने अखिल भारतीय पेशवा संघटना गेवराई तालुकाप्रमुख अनिल बोर्डे यांनी केले आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु.निकिता थावरे, पलक डोंगर ची विद्यापीठ व्हॉलीबॉल संघात निवड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ डिसेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा महिलांचा व्हॉलीबॉल संघ जाहीर झाला, या संघामध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या कु. निकिता थावरे व पलक डोंगरे या दोन विद्यार्थिनींची निवड झाली आहे, या. विद्यार्थिनी नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे.मागील तीन वर्षांपासून या विद्यार्थिनींची निवड विद्यापीठ स्तरावरती चांगल्या खेळाच्या जोरावरती होत आहे.

या विद्यार्थिनींना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश दादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए.कवळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे, प्रा. टाक सर. प्रबंधक प्रशांत चव्हाण, सतीश येरंडे, भोंडवे सर,प्रा. डॉ. रुद्रवार सर, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. एकनाथ मस्के, प्रा. बनसोडे सर.आदींनी अभिनंदन केले.

# भव्य शोभायात्रेने माँ कनकेश्वरीच्या शिव महापुराण कथेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ डिसेंबर**

माजलगाव येथील समस्त राजस्थानी समाज व श्री.सदगुरु सत्संग गोसेवा समितीच्या वतीने कौशल्यादेवी बजाज मैदान मंगलनाथ बायपास रोड आयोजित माँ कनकेश्वरी देवी यांच्या श्री शिवमहापुरान कथेला भव्य दिव्य शोभा यात्रेने आज प्रारंभ झाला.



कथेच्या प्रथम दिनी भव्य दिव्य शोभायात्रा काढून कथेला सुरुवात केली आहे या शोभायात्रात ढोल ताशा पथक पुणे येथील व श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या मुलाचे ढोलताशा पथक व माजलगावाती प्रसिद्ध बॅन्ड ने वाजतगाजत शिवपुराण पोथीची मिरवणूक काढण्यात आली होती या शोभायात्रेत महादेव पार्वती ची झाकी,कलशधारी महिला लहान मुले,मुली व महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद व उत्साही वातावरणात ही शोभायात्रा काढण्यात आली होती .

सुप्रसिद्ध शिवमहा पुराण कथाकार महामंडलेश्वर श्री.श्री. १००८प.पु.मॉ.कनकेश्वरी देवीजी यांच्या वाणीतुन दिनांक ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर दुपारी २ ते ५ या वेळेत होणार आहे.या शिवमहापुराण कथेसाठी भव्य दिव्य मंडप,सजावट करण्यात आली आहे. मंडप मध्ये अतिथी साठी सोफे गाद्या, पत्रकार बांधवासाठी विशेष व्यवस्था व बाकी सर्वांसाठी खुर्च्यांची व्यवस्था केली आहे, कार्यक्रमास मराठवाड्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातुन माँ यांचा भक्त परिवार शिवमहापुरन कथा श्रवणासाठी येणार आहेत.



या भक्तांची थांबण्याची तसेच चहा,नाश्ता,भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे.

या शिवमहापुराण कथे चें मुख्य यजमान श्री जुगलकिशोरजी लड्डा (टाकरवण ) हे आहेत.

माजलगाव येथील संपूर्ण राजस्थानी समाज,शिवभक्त व गोसेवक यानी या कथेचे नियोजन केले आहे.

तसेच या कथेचे यजमान जुगलकिशोर सीतारामजी लड्डा हे आहेत.महाप्रसादाचे मुख्य यजमान करवा ( डासाळा ) परिवार आहे.

महिलांचा लक्षनीय सहभाग

राजस्थानी समाजातील महिलांचा या शोभयात्रेत लक्षणीय सहभाग होता. अनेक कळशधारी महिलांनी शोभा यात्रेला सहभाग घेतला.

कथा श्रवणाचा लाभ घ्या-राजस्थानी समाज

माजलगाव येथे पंचक्रोशीतील सर्व भाविकभक्तांनी या कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका माहेश्वरी सभा, जैन श्रावक संघ, विप्र समाज तथा समस्त राजस्थानी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य कॅन्डल रॅली

## माजलगावात विविध कार्यक्रमातुन महामानवाला अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ डिसेंबर**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त माजलगाव शहरात अभिवादन रॅली तसेच भव्य कॅण्डल रॅलीचे आयोजन क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या दोन्हीही रॅलींना माजलगावातील हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात विविध ठिकाणी कार्यक्रम घेऊन मानवंदना देण्यात आली .सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून अभिवादन रॅलीची सुरुवात झाली. रॅली सांची बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प येथे पोहोचली, तर रॅली नंतर प्रा. संजय बागुल यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

सायंकाळी ७ वाजता भारतीय बौद्ध महासभा व क्रांतिसूर्य बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सुंदरराव सोळंके महाविद्यालयापासून भव्य कॅण्डल रॅलीला शांततेत सुरुवात झाली. हातात प्रज्वलित मेणबत्त्या घेऊन हजारो महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक सहभागासाठी पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सर्वांनी बुध्दवंदना घेऊन महामानवांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही, समानता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला दिशा देणारा ठरत असून, या विचारांनी प्रेरित होऊन नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाल्याचे दृश्य सर्वत्र पाहायला मिळाले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवर, महिला मंडळ, युवक, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते आणि माजलगावकरांचे क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार बीड मध्ये आले असता शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी त्यांची भेट घेतली यावेळी शिवसंग्राम शहराध्यक्ष सुहास पाटील, मनोज जाधव

# जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली जागतीक एड्स दिनानिमित्त सायकल रॅली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड च्या वतीने जागतीक एड्स दिन व पंधरवाडा निमित्त दिनांक ०५डिसेंबर २०२५ रोजी सायकल रॅलीचे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आली होती.

या वर्षीचे जागतीक एड्स दिनाचे घोषवाक्य होते- अडथळयावर मात करु, एकजुटीने एचआयव्ही/एड्सला लढा देऊ, नवं परिवर्तन घडवु जिल्हा न्यायालय बीडचे न्यायधीश अ. वहाब सय्यद, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सदस्य सचिव, व डॉ. मोहम्मद मुजाहेद मोमीन, जिल्हा रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांनी रॅलीस हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीचे उद्घाटन केले.

सदर रॅली करिता डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, डॉ. अनंत मुळे, डॉ. महेशकुमार माने, डॉ. सुधीर राऊत, डॉ. रविकांत चौधरे, डॉ. अरुण राऊत, अधिसेवीका श्रीमती रमा गिरी, प्रतीक जोशी, अजय ढाकणे, दत्ताजी बारगजे, डॉ. राजन दहीवाळ, रोटरी क्लब अध्यक्ष रो. राहुल बीरा, सचिव रो. प्रकाशजी कोंका, डॉ. देशमाने, लक्ष्मण मळेकर, गणेश वाघ, भोसले, भारत काका शेटे, इन्नर व्हील क्लब अध्यक्ष भारती मुंदडा, पाठक, अर्चना झोडगे, सामाजीक कार्यकर्ते तत्वशिल कांबळे विविध शाळा व रेड रिवन क्लब महाविद्यालयाचे प्रमुख तसेच विद्यार्थी युवक-युवती यांची उपस्थिती होती.

सदरील रॅलीची सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन करण्यात आली ही रॅली पुढे कारंजा, बलभिम चौक, माळीवेस, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, बस स्टॅड मार्ग परत श्री छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण बीड येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

समारोप कार्यक्रम प्रसंगी रॅलीचे प्रास्तावीक जिल्हा कार्यक्रम सुहास कुलकर्णी यांनी केले. सुरुवातीला दत्ताजी बारगजे इंफंट इंडिया प्रकल्प संचालक यांनी एचआयव्ही/एड्स जनजागृतीमध्ये महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, डापकु कार्यात्यामार्फत केलेल्या कार्याचा उल्लेख केला व एचआयव्ही जजनजागृतीसाठी सामुदायीक प्रयत्नांची गरज विषद केली.

# गायगोठा बांधकामाला अपुरी मदत; सुधारीत अनुदान लागू करा- अनिल जगताप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**

रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना गायगोठा बांधकामासाठी मंजूर असलेली रु. ८३,११४/- ही रक्कम अपुरी ठरत असल्याने शासन आदेशानुसार सुधारीत तरतूद लागू करून अनुदानवाढ द्यावी, अशी जोरदार मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. योजनेनुसार सध्या बीड मतदारसंघातील शेतकऱ्यांना गोठा बांधकामासाठी निश्चित रक्कम उपलब्ध होते. मात्र बांधकाम साहित्य, मजूरी आणि तांत्रिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे ही रक्कम काम पूर्ण करण्यास पुरेशी राहत नाही, असे जगताप यांनी निवेदनात नमूद केले आहे.

शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो-२०२०/प्र.क्र.७०/ रोहयो-७ मधील सुधारीत तरतूदीनुसार २ ते ६ गुरांसाठी एक गोठा आणि ६ पेक्षा अधिक गुरांसाठी ६ पटीने अनुदान देण्याची तरतूद स्पष्टपणे करण्यात आली आहे. १२ गुरांसाठी दुप्पट, १८ गुरांसाठी तिप्पट अनुदान देण्याची मुभा असून त्यापेक्षा जास्त अनुदान अनुज्ञेय नाही, असेही परिपत्रकात नमूद आहे. मात्र ही सुधारित तरतूद बीड तालुक्यात अद्याप लागू करण्यात आलेली नाही, तर इतर सर्व तालुक्यात अंमलात आली आहे. यामुळे बीड तालुक्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होत असून त्यांना गंभीर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते, अशी व्यथा अनेक शेतकऱ्यांनी लेखी व तोंडी स्वरूपात मांडल्याचे जगताप यांनी सांगितले. शासन परिपत्रकातील तरतूद स्पष्ट असताना बीड तालुक्यातच सुधारित अनुदान लागू न होणे हा अन्याय आहे. शेतकऱ्यांना टिकाऊ आणि सुरक्षित गोठे बांधण्यासाठी सुधारीत रक्कम मिळणे अत्यावश्यक आहे. असे अनिलदादा जगताप यांनी निवेदनात म्हटले आहे. जगतातील परिस्थिती लक्षात घेता शासन निर्णयाची समान अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी तातडीची मागणी करण्यात आली आहे.



# महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेच्या-२०२५ च्या तारखेत बदल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ व दिनांक ४जानेवारी, २०२६ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ आयोगाच्या दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार पुढे ढकलण्यात येत आहे. ही परीक्षा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आली आहे.

परीक्षेचे नाव महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केलेली होती ही परिक्षा पुढे ढकलण्यात आली असून दि. ४ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ दि. ११ जानेवारी, २०२६ रोजी घेण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव अ.ग. लेंडवे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

नियोजित वेळापत्रकानुसार प्रस्तुत परीक्षेच्या आयोजना संदर्भातील सर्व संवेदनशील कार्यवाही तयारी झालेली असल्याने उमेदवारांच्या बैठक व्यवस्थेकरीता रविवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी निश्चित करण्यात आलेली परीक्षा उपकेंद्रेचा दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी नियोजित परीक्षेकरीता निश्चित करण्यात आली आहेत तसेच दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी निश्चित करण्यात आलेली परीक्षा उपकेंद्राचा दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी नियोजित परीक्षेकरीता निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार, दिनांक २१ डिसेंबर, २०२५ व दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी नियोजित परीक्षांकरीता आयोगाकडून अंतिम करण्यात आलेल्या परीक्षा उपकेंद्रेचा दिनांक ४ जानेवारी २०२६ व दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजीच्या परीक्षेसाठी निश्चित करण्यात आली असून नियोजित परीक्षा केंद्रावरच ही परीक्ष घेण्यात येईल याची परीक्षार्थीनी नोंद घ्यावी.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव कटीबध्द – जिल्हाधिकारी

## जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजदिन निधी संकलनाला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ डिसेंबर**

देशात शांतता व अखंडता टिकवून ठेवण्याचे काम सीमवरील सैनिकांनी स्वत:च्या शौर्याने, धैर्याने कमीत कमी साधनसामग्रीद्वारे चांगल्या प्रकारे करत आहेत. आपल्या कुटुंबियांची पर्वा न करता अविरतपणे सेवा करत आहेत. त्यांच्या बलिदानामुळेच आपण सुरक्षित आहोत, असे सांगून माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी सांगितले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन प्रारंभाच्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, सहायक जिल्हाधिकारी योगेश मीना, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सैनिक कल्याण अधिकारी अभिमन्यू बोधवड आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता पुढे म्हणाले, सर्व सैनिकांविषयी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाच्या माध्यमातून कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यावर्षी ३१ लक्ष रुपये ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट होते. ४१ लक्ष रुपये ध्वजदिन निधी संकलन करुन ध्वजदिन निधी संकलनामध्ये १३३ टक्के उद्दिष्ट पूर्ण करुन जिल्ह्याचा नावलौकिक केला आहे. त्यामुळे सर्वांचे अभिनंदन केले. तसेच पुढील वर्षीही राज्यात सर्वाधिक ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण करु, असे सांगून जिल्ह्यातील सैनिकांच्या, त्यांच्या कुटुंबियांच्या अडचणी, तक्रारी, गाऱ्हाणी, वेतन व इतर सोयीसुविधांच्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी लवकरच बैठक घेऊन ते सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी आपल्या देशाचे सैनिक आपल्या प्राणाची बाजी लावून दुर्धर परिस्थितीत देशाचे रक्षण करतात. त्या सैनिकाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रम घेण्यात येतो. निधी संकलनाचे उद्दिष्टापेक्षा जास्त निधी संकलन केल्यामुळे सर्व यंत्रणेचे अभिनंदन केले. तसेच माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिबिरे घेऊन प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा सैनिक कल्याण अधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी संरक्षण दलाचे जवान व अधिकारी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अहोरात्र देशाच्या सीमांचे रक्षण करतात. त्यामुळेच आपण सुखी जीवन जगत असतो, या सर्व सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या निधीतून माजी सैनिक, शहीद जवान अधिकारी यांचे कुटुंबियासाठी विविध योजनांच्या माध्यमातून मदत करण्यात येते. हिंगोली जिल्ह्याने यावर्षी १३३ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहेत. त्यामुळे सर्व यंत्रणेचे अभिनंदन केले. त्यामुळे पुढील वर्षाचे उद्दिष्ट कालावधीची वाट न पाहता वेळेत उद्दिष्ट पूर्ण करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले व देशासाठी बलिदान दिलेल्या सैनिकाप्रती दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. तसेच यावेळी मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या चमूने स्वागत गीत व देशभक्तीपर गीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. यावेळी ध्वजदिन निधी संकलनाचे उत्कृष्ट कार्य केलेल्या कार्यालय प्रमुखांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. शहीद सैनिक गणपत भिकाजी रणवीर यांच्या मातेचा साडीचोळी देवून सत्कार केला. तसेच पतीच्या वाढदिवसानिमित्त एक महिन्याचे निवृत्तीवेतन ध्वजदिन निधीसाठी दिल्यामुळे सरस्वती बैरागी यांचा, माजी सैनिक चंपतराव कदम यांचा सपत्नीक तर माजी सैनिक मारोतराव टाक व सय्यद मीर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर इंगोले यांनी केले. तर आभार प्रदर्शन तुकाराम मुकाडे यांनी केले. या कार्यक्रमास वीर माता-पिता, माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी उपस्थित होते.

# हिंगोलीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमालेचे आयोजन

## श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ डिसेंबर**

येथील कै. शिवाजीराव सभागृहात श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने झुंजार लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमाला १५डिसेंबर ते १७ डिसेंबर २०२५ दरम्यान सायंकाळी ७:३० ते ९:३० या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील महापुरुष व संत यांच्या विचारातून पुरोगामीत्व प्राप्त केलेली महाराष्ट्र ही संत भूमी असून बहुजन समाजाला अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी सामाजिक चळवळ उभे केलेली आहे. या व्याख्यानमालेतून समाजातील संविधानिक व नैतिक मूल्य जपणुकीसाठी सामाजिक प्रबोधन करण्याचा आयोजकांचा मानस आहे. व्याख्यानमाला आयोजनाचे हे चौथे वर्ष आहे.

पहिले पुष्प १५ डिसेंबर रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते व कीर्तनकार भावरत्न गुरूदास हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा हे खरोखरच माणसांत समन्वय साधणारी आध्यात्मिक शक्ती निपजेल का? या विषयावर व्यक्त होणार आहेत. दुसरे पुष्प १६ डिसेंबर रोजी महिलना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले असून व्याख्यात्या ॲड सुरेखा दराडे (एम.ए, एल एल.बी.) ह्या महिला स्वातंत्र्य: कल्पना आणि वास्तव या विषयावर व्यक्त होतील. तिसरे पुष्प १७ डिसेंबर रोजी व्याख्याते प्रा. उद्धव बापू फड( महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते व संवादयात्री) तरुणाईचा देश दिशाहीन होतोय का? या विषयावर गुंफणार आहेत.

हिंगोलीकर व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील युवक माता-भगिनी बंधूंनी व्याख्यानमालेचा आनंद घ्यावा. श्रोत्यांनी या व्याख्यानासाठी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोलीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिरड शहापूर येथे माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन साजरे




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ डिसेंबर**

शिरड शहापूर येथे १९९९-२००० मध्ये इयत्ता १० वी चे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. २५ वर्षांनी सर्व माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देणारा भावनिक क्षण साजरा केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विठ्ठलराव लुटे तर प्रमुख पाहुणे म्हणून परळीकर, थोरात, गुंटूरकर, जाधव, चंद्रवंशी, दत्तराव ठोंबरे सेवक उमराव ठोंबरे यांची उपस्थिती होती.

यावेळी मुंडिक, भिसे, वारे, भक्कड, बीच्चेवार, कुतुब यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांमधून कल्पना जोगदंड, अनिल कांबळे, संदीप परळीकर, आशा राऊत, ज्ञानेश्वर ठोंबरे यांनी शालेय जीवन, शिक्षकांचे मार्गदर्शन व मैत्रीच्या आठवणी शेअर करत सर्वांना भावविवश केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना जोगदंड व संदीप परळीकर तर आभार प्रदर्शन गीतेश स्वामी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर ठोंबरे, ज्ञानेश्वर बोंगाणे, संदीप परळीकर, लक्ष्मण भगत, गजानन रावले, कंठेश्वर रावले, राठोड, माऊली कुरे, जावेद शेख, मीरा चव्हाण, अशा राऊत, अनिल कांबळे, कल्पना जोगदंड आणि सर्वच स्नेही मित्रमंडळी यांनी परिश्रम घेतले.

# हिंगोलीत सोयाबीनची आवक, प्रतिक्विंटल ४३०० ते ४५०० भाव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ डिसेंबर**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवा मोंढा परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची आवक आली असून सोमवारी सोयाबीनला प्रतिक्विंटल ४३०० रूपये ते ४५०० रूपये भाव मिळाला.

सध्या येथील नवा मोंढा परिसरात मोठ्या प्रमाणावर सोयाबीन शेतकरी विक्रीस आणीत आहेत. सोमवारी सकाळपासूनच शेतकऱ्यांनी वाहनच्या द्वारे सोयाबीन विक्रीसाठी आणले होते. यावेळी सोयाबीनला ४५०० रूपयांपर्यंत भाव मिळाला परंतु हा भाव कमी असल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. त्यांचा उत्पादन खर्चही निघत नसून अतिवृष्टीमुळे यावर्षी सोयाबीनचा उताराही कमी आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक झळ बसली आहे त्यातच सोयाबीनला कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत असतांना दिसत होती.


## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊमध्ये महापरिनिर्वाण दिन



हिंगोली- येथील कै. ॲड ग्यानबाराव शिरसाट संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन विद्यालयात ६ डिसेंबर ,रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक एस एस बल्लाळ आणि पर्यवेक्षक कान्हेड यांनी प्रतिमा पूजन केले. नंतर विद्यार्थ्यांनी संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला,तसेच सामाजिक न्याय. समता, बंधुता, शिक्षणाच्या महत्त्वाबद्दल विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. यावेळी शिक्षकवृंद राजश्री पडघन, विद्या कान्हेड, नुतन वाबळे, अभिषेक चाटसे, आशा पाईकराव, भाग्यश्री ठोके, ज्योती सोळंके, कांचन टेकाळे आणि इम्रान व नरवाडे ताई आदींची उपस्थिती होती.

### थंडीमुळे सुकामेवा खरेदीसाठी गर्दी



हिंगोली- थंडीचे दिवस सुरू झाले असून शहरातील फुल मंडी परिसरात सुखा मेव्याची दुकाने थाटली आहेत. थंडी सुरू झाली असून ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिक हे सुकामेवा खरेदी करताना दिसत आहेत. काजू ८०० किलो, खारीक १५० ते ३०० रू किलो, आक्रोड ७०० किलो, डिंक ४०० किलो, गोंडबी १४०० किलो, मेथी ८० किलो, अमरावती साखर ७० किलो, खोब्रा ३५० किलो, मनुका ५०० किलो, ग्रीन फिस्ता १२०० किलो, गुळ ५० किलो, सर्व सुखा मेवा ठोक-किरकोळ दरात मिळतील मैनू भाई तांबोळी यांनी सांगितले.

### ८२ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८२ वाहन चालकांविरूध्द हिंगोली पोलिसांनी कार्यवाही करीत वाहन चालकांकडून ८० हजार २०० रूपयांचा दंड वसूल केला आहे तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत एका ठिकाणी छापा मारून ६८०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# कर्ज व नापिकीमुळे शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ डिसेंबर**

औंढा नागनाथ तालुक्यातील येहळेगाव सोळंके येथे शेतकऱ्याने कर्ज व नापिकीला कंटाळून शेतात गळफास घेतल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात रविवारी सायंकाळी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील येहळेगाव सोळंके येथील गोविंदा सोळंके यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या पावने दोन एकर शेतीवर सन २०२३ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण बँक औंढा नागनाथ शाखेतून ४५ हजार रूपयांचे कर्ज घेतले होते. मात्र मागील सततची नापिकी असल्यामुळे कर्ज कसे फेडावे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. यावर्षी खरीप हंगामामध्ये सततच्या अतिवृष्टीमुळे शेतातील सोयाबीन व इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले. लागवडीचा खर्चही निघाला नसल्यामुळे आता उदरनिर्वाह कसा करावा तसेच कर्ज कसे फेडावे या चिंतेत ते होते. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ते अस्वस्थ होते. शेतात जाऊन येतो असे सांगून ते घरून निघाले होते. त्यानंतर ते घरी परत आलेच नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला असता त्यांचा मृतदेह शेतातील झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.या घटनेची माहीती मिळाल्यानंतर गावकऱ्यांनी शेतात एकच गर्दी केली होती.या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे.

याप्रकरणी मंगलबाई सोळंके यांच्या माहीतीवरून औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.पोलिस निरीक्षक जी एस राहीरे, जमादार रवीकांत हरकाळ पुढील तपास करीत आहेत.मयत गोविंदराव यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

# हिंगोलीच्या जात पडताळणी कार्यालयात शेकडो फाईल्स धुळखात, विद्यार्थी चकरा मारून बेजार




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ डिसेंबर**

कुणी पुढील उच्च शिक्षणासाठी, कुणी नोकरीसाठी तसेच इतर महत्वाच्या कारणासाठी जात पडताळणी कार्यालयाकडून जात पडताळणी सर्टीफिकेट मिळवण्यासाठी कार्यालयात फाईल सादर करतात परंतु हिंगोली कार्यालयात जात पडताळणी प्रमाणपत्र सहजासहजी मिळत नसल्याचे दिसत आहे. या कार्यालयात अनेक फाईल्स धुळखात पडल्या आहेत.

एकीकडे राज्य सरकार गतिमान प्रशासनाचा डंका वाजवत आहे परंतु हिंगोली येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात सहा-सहा महिने जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे शासनाचा दावा फोल ठरत आहे. या ठिकाणी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या कार्यालयात जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय आहे. अनेक विद्यार्थी, पालक, लाभार्थी जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्यासाठी विविध कागदपत्रे जोडून येथे फाईल सादर करतात. कोणाला नोकरी, कोणाला उच्च शिक्षणासाठी तर कोणाला इतर महत्वाच्या कारणास्तव प्रमाणपत्राची आवश्यकता असते परंतु येथील अधिकारी व कर्मचारी कधी त्रुटी काढून तर कधी अधिकारी इतर कारणे सांगून नागरिकांना परेशान करीत असल्याचे चित्र दिसत आहे.

या कार्यालयात चिरीमिरी घेतल्याशिवाय कोणतेही काम होत नसल्याच्या तक्रारी नागरिक अनेकवेळा करतात परंतु येथील अधिकारी व कर्मचारी मात्र ऐवढे निर्ढावलेले आहेत की त्यांना काहीच देणेघेणे नाही अशा अविर्भावात वावरत असतात.

जिल्ह्यातील हिंगोलीसह वसमत, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ येथील शहरी व ग्रामीण भागातील नागरिक कार्यालयात जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी वारंवार चकरा मारीत असतांना दिसत आहे. याकडे संबंधित यंत्रणेने लक्ष घालावे अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत आहे.

# हिंगोलीत रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी अमरजीत सिंग यांची निवड




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ डिसेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक केंद्रीय सदस्य तथा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मधुकरराव मांजरमकर यांनी दि. ७ डिसेंबर रविवार रोजी आमंत्रित केली होती. बैठकीस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. राजेंद्र गवई, मार्गदर्शक डॉ. कमलताई गवई, अरुलनीती ममोहन, जकप्पा कांबळे, रामराव दाभाडे, डॉ. चहल, अमरजितसिंह धनौला, तेलुराम नाफेरीया अदिसह १९ राज्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

हॉटेल देव पॅलेस येथे आयोजित केलेल्या बैठकीत सुरुवातीला मान्यवरांनी देश पातळीवर पक्षाचे कार्य व भूमिका या संदर्भात विचार व्यक्त केले. त्या नंतर राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली. या निवडणुकीचे रिटर्निंग अधिकारी रामराव दाभाडे यांनी अमरजितसिंह धनौला (पंजाब) यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर केली.

नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष अमरजित सिंह धनौला यांनी त्यांची नवीन राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर केली त्यामध्ये राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. (डॉ.)अजितसिंग चहल, राष्ट्रीय सरचिटणीस- डॉ.राजेंद्र गवई, डॉ. बालकृष्ण - राष्ट्रीय सचिव, गुरदीप सिंग बहिया- राष्ट्रीय सचिव, रामराव दाभाड़े -राष्ट्रीय कोषाध्यक्ष ,मधुकरराव मांजरमकर-राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य अधिक पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केली.

सूत्रसंचालन प्रकाश इंगोले यांनी केले तर शेवटी आभार ॲड. दिपक मांजरमकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष चंद्रमुर्ती मांजरमकर, ॲड विजय धावसे, कांबळे आदींसह जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास १९ राज्यांतील पक्ष पदाधिकांऱ्यासह महाराष्ट्र, मराठवाडा व हिंगोली जिल्ह्यातील पदाधिकारी, युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# राष्ट्रमाता जिजाऊ विद्यालयात विद्यार्थी व पालक मेळावा



**हिंगोली, ८ डिसेंबर**

कै.ॲड ग्यानबाराव सेवाभावी संस्थेच्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन शाळेत शैक्षणिक सत्रातील दुसरा पालक विद्यार्थी शिक्षक चर्चा सत्र (पालक मेळावा) आणि प्रथम सत्र परीक्षा निकाल याचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिक्षक आणि पालक यांची जवळीक साधून विद्यार्थ्यांच्या अभ्यास आणि अभ्यास व्यक्तिरिक्त मुद्दावर चर्चा करण्यात आली तसेच यावेळी प्रथम सत्र परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना देण्यात आला. या चर्चातील पालकांनी शाळेबद्दल व पाल्याबद्दल आपले अभिप्राय दिले. या चर्चासत्राला अनेक पालकांनी उपस्थिती दर्शवली तसेच शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, पर्यवेक्षक श्रीकांत कान्हेड, अभिषेक चाटसे,विद्या कान्हेड, नुतन वाबळे, राजश्री पडघन,आशा पाईकराव, भाग्यश्री ठोके, कांचन टेकाळे, आणि ज्योती मेटकर उपस्थित होते.

## गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे प्रकरण

# मागण्या मान्य होईपर्यंत सामूहिक रजा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ८ डिसेंबर-**

आर्वी पंचायत समितीतील मनरेगा प्रकरणात गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांची झालेली कथित नियमबाह्य अटक हा अधिकाऱ्यांवरील अन्याय असल्याचा आरोप करत महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने आज आंदोलन अधिक तीव्र करण्याची घोषणा केली. यापूर्वी दोन दिवसांच्या सामूहिक रजेनंतर आता ८ डिसेंबरपासून मागण्या मान्य होईपर्यंत राज्यभरातील सर्व अधिकारी सामूहिक रजा आंदोलन करणार आहेत. या काळात कोणतेही शासकीय काम न करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

संघटनेचे म्हणणे आहे की, मनरेगा, घरकुल व तत्सम योजनांमध्ये एफआयआर दाखल करण्यापूर्वी शासनाची पूर्वपरवानगी अनिवार्य असणे गरजेचे आहे. प्राथमिक विभागीय चौकशीविना अधिकारी वर्गावर थेट गुन्हा दाखल करणे योग्य नसून, महिला अधिकाऱ्यांवर कारवाई करताना कायदेशीर प्रक्रिया पाळली जात नाही, असा आरोपही संघटनेने केला




आहे. तांत्रिक प्रणालीतील त्रुटींची जबाबदारी अधिकारी वर्गावर ढकलणे चुकीचे असल्याचे नमूद करत डिजिटल व्यवहारांमध्ये भूमिका, जबाबदाऱ्या व प्रक्रिया-स्तर स्पष्ट करणारी मार्गदर्शक तत्त्वे शासनाने तातडीने जारी करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. कंत्राटी कर्मचारी, ऑपरेटर किंवा लाभार्थी प्रत्यक्ष तांत्रिक प्रणाली हाताळत असतात; त्यामुळे फसवणुकीच्या घटनांमध्ये प्राथमिक जबाबदारी प्रथम त्यांच्या दिशेने निश्चित करावी तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यावर फौजदारी कारवाई दोष सिद्ध झाल्यावरच करावी, अन्यथा प्रथम चौकशी व स्पष्टीकरण प्रक्रियेचा अवलंब करावा, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

सुनीता मरसकोल्हे व इतर तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांना चुकीच्या कारवाईपासून तात्काळ संरक्षण देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. घटनाक्रमात प्राथमिक तपास न करता करण्यात आलेली अटक ही नियमबाह्य असून संपूर्ण प्रणालीतील त्रुटींसाठी अधिकाऱ्यांना गुन्हेगार ठरविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संबंधित मागण्यांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटना संलग्न नांदेड शाखेने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले असून त्यावर संघटनेचे अध्यक्ष संदीप मोळोदे, सरचिटणीस राजकुमार मुक्कावार, कोषाध्यक्ष दत्तात्रेय गिरी, कार्याध्यक्ष डॉ. संजय तुबाकले व जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## भाड्याच्या खोल्यांमध्ये सुरू असलेल्या अंगणवाड्यांना स्वतःची हक्काची इमारत द्या!

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ८ डिसेंबर-**

मुलांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असलेल्या अंगणवाड्यांमध्ये मुलांना पूर्व-शाळा शिक्षण देण्यासाठी जागा, स्वतंत्र स्वयंपाकघर,मुलांसाठी शौचालय, पिण्याचे पाणी आणि खेळाची योग्य सोय आवश्यक असते. जिथे पोषण, आरोग्य आणि शिक्षणाशी संबंधित सेवा दिल्या जातात. परंतु माहूर शहरातील एकात्मिक बाल विकास सेवा नागरी प्रकल्प क्रमांक-३ नांदेड अंतर्गत सुरू असलेल्या १५ अंगणवाड्यांच्या खोल्यांची अवस्था अतिशय बिकट झाली असल्याने सध्या भाड्याच्या घरात सुरू असलेल्या ह्या अंगणवाड्यांना हक्काची जागा उपलब्ध करून स्वतःची इमारत देऊन सोयी सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी माहूर नगरपंचायतचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी,मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्याकडे दि. ०८ डिसेंबर रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

माहूर शहरात एकात्मिक बाल विकास सेवा नागरी प्रकल्प-३ अंतर्गत १५ अंगणवाड्यात जवळपास ५०० बालकं पूर्व-प्राथमिक शिक्षण घेत आहेत. या सर्व अंगणवाड्या भाड्याच्या घरात असून, दोन अंगणवाड्या ग्रामपंचायत काळातील



बांधकाम झालेल्या आहेत. त्यामुळे त्याही मोडकळीस आलेल्या आहेत त्यामुळे अनेक दिवसांपासून अंगणवाडी सेविका ह्या वरिष्ठ कार्यालय आणि नगरपंचायत कडे या अंगणवाड्यात शिक्षण घेणाऱ्या मुलांचे भविष्य धोक्यात आल्याने अंगणवाड्यासाठी नवीन जागा, नवीन इमारत आणि सेवा सुविधा पुरविण्यात याव्यात, अशी मागणी करत आहेत.

यावेळी अंगणवाडी सेविका संघटनेच्या अध्यक्षा सत्त्वशीला पंडित, वंदना जाधव, सुनीता भगत, मीना मनवर, सुनिता पवार, रेणुका पत्की, अंजली खडसे, सीमा पद्मावार, शीतल सौंदलकर, नबुबाई वानखेडे, चित्रा देशपांडे, सलमा शेख युसूफ, शारदा दूहलवार, कांता स्वामी, सुलोचना कमठेवाड यांचे सह कार्यालय अधीक्षक संदीप गझलवाड, लेखापाल विशाल मरेवाड, अभियंता रोहित डुकरे, विशाल ढोरे, स्वाती गुव्हाडे, धनंजय कळसकर, मझहर शेख, विजय शिंदे यांचे कर्मचारी उपस्थित होते.



## विजयकुमार बेंबडे, श्रीनिवास मस्के यांना साने गुरुजी विचार साधना पुरस्कार


**नांदेड**-पुणे येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा श्यामची आई हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार मुदखेड येथील सरदार वल्लभभाई पटेल विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा साहित्यिक विजयकुमार बेंबडे आणि त्यांच्या मातोश्री शारदाबाई धोंडीराम बेंबडे यांना जाहीर झाला आहे. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. साने गुरुजी यांनी आपल्या आईची सेवा करून आपले नाव अजरामर केले. बेंबडे हे नोकरीच्या निमित्ताने बाहेरगावी राहात असले तरी आपल्या आईच्या सेवेत त्यांनी कसलीही कमतरता पडू दिली नाही. आपला जास्तीत जास्त वेळ ते आईच्या सेवेसाठी देतात. त्यांच्या या कार्याची नोंद प्रतिष्ठानने घेतली आहे. प्रसिध्द रानकवी तथा गिरगाव येथील हु.बहिर्जी स्मारक विद्यालयाचे शिक्षक श्रीनिवास मस्के यांना साने गुरुजी विचार साधना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. शाल, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. साने गुरुजी शिक्षक प्रतिभा या पुरस्काराचे मानकरी वसमत येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या शिक्षिका तथा आंतरभारतीच्या उपाध्यक्षा संगीता देशमुख, चतुर्मुखी विनायक माध्यमिक-उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक तथा कवी पांडुरंग बोराडे आणि लोळेश्वर येथील जि.प. शाळेचे प्रयोगशील शिक्षक मुंजाजी जोगदंड हे ठरले आहेत. दि.१७ डिसेंबर रोजी सकाळी ११:०० वाजता वसमतनगर येथील महात्मा गांधी विद्यालयात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते समाजवादी नेते ॲड. रामचंद्र बागल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. याप्रसंगी पुण्याचे उद्योजक सुदाम भोरे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम, प्राचार्य नागनाथ पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रसिध्द व्याख्याते बाजीराव सातपुते हे साने गुरूजी यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणार आहेत. या कार्यक्रमाला रसिक, श्रोते, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी केले आहे.

## देगलूरच्या खेळाडूंची राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी निवड

**देगलूर** -देगलूर महाविद्यालयाने पुन्हा एकदा क्रीडा क्षेत्रात आपली चमकदार छाप उमटवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील तुकाराम मट्टमवार, पवन रघुपतिवार, योगेश येरकलवार (व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी) तसेच रोहन गवळी, रविना गवळी आणि रीना गवळी (थलेटिक्स स्पर्धेसाठी) या प्रतिभावान खेळाडूंची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा महोत्सव संघात निवड झाली आहे. दरम्यान दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान नांदेड विद्यापीठात संपन्न झालेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात या खेळाडूंनी विद्यापीठाचे यशस्वी प्रतिनिधित्व करून देगलूर महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. या खेळाडूंना क्रीडा संचालक डॉ. निरज उपलंचवार, प्रा. दिपक वावधाने आणि प्रा. सिताराम हाके यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कठोर परिश्रम, प्रशिक्षण आणि प्रोत्साहनामुळे या खेळाडूंनी राज्य पातळीवरील संघात स्थान पटकावले आहे. या कामगिरीबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार तसेच संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार, सूर्यकांत नारलावार, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, प्रा. एम.एम. चमकुडे, डॉ. व्ही.जी. शेरिकर, पर्यवेक्षक श्री संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. देगलूर महाविद्यालयातील या उज्वल यशामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेला नवी ऊर्जा मिळाली आहे.

## दहा वर्षांच्या रुद्रची पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये दमदार कामगिरी

**मुक्रमाबाद** -देगलूर येथील पोतदार इंग्लिश स्कूल मध्ये पाचवी वर्गात शिकत असलेला दहा वर्षांचा रुद्र ज्ञानेश्वर रातोळीकर नंबर (इखइ छज.२१९९५) यानी रविवारी पुणे येथे पार पडलेल्या इंटरनॅशनल मॅरेथॉनमध्ये २१ किलोमीटर हाफ-मॅरेथॉनचे अंतर १५५ मिनिटं (२:३५) मिनिटात यशस्वीरीत्या पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. एवढ्या लहान वयात इतक्या मोठ्या अंतराची शर्यत पूर्ण करून नांदेड जिल्हयाचे नाव लौकिक केल्यामुळे रुद्रचे सर्वत्र कौतुक होत आहे.. रुद्रच्या पालकांनी आणि प्रशिक्षकांनी त्याच्या शिस्तीचे, मेहनतीचे आणि सातत्याचे कौतुक केले. शर्यत आयोजकांनीही इतक्या लहान वयात २१ किमी.पूर्ण केल्याबद्दल त्याचा विशेष गौरव केला. त्याच्या यशा बदल मामा निखील पा. कोठारे व तलाठी सतीष देशमुख,औदुबंर वाडीकर, शिवाजी तोत्रे, महेश पदाजी, मारोती भुताळे, सदाशिव बोयवार, शेशीकांत तेलंग, अमजत पठाण, अशोक लोणीकर, रज्जाक कुरेशी, शिवओम पाटीलसह आदीने अभिनंदन केले आहेत.



## रत्नेश्वरी देवस्थानचा विकास होणार ; वडेपुरी सर्कल येथून रेल्वे जाणार

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड, दि. ८ डिसेंबर-**

नांदेड लातूर या प्रस्तावित नव्या रेल्वे मार्गाच्या उभारणीमुळे मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दळणवळणातील अडथळे दूर होऊन उद्योग, रोजगार, शिक्षण व व्यवसायाच्या संधींना मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. या रेल्वे प्रकल्पाद्वारे नांदेडलातूर तसेच नांदेडबिदर ही महत्त्वाची शहरे एकाच मार्गाने जोडली जाणार असल्याने हा रेल्वे मार्ग भविष्यात मराठवाड्यातील जनतेचा 'भाग्यविधाता' ठरेल,असे चित्र दिसत आहे.




संसदेच्या हिवाळी अधिवेशनात खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी या अत्यंत महत्त्वपूर्ण मागणीचा जोरदार पद्धतीने पाठपुरावा केला. त्यांच्या पुढाकारामुळे सदर मार्गाच्या सर्वेक्षण व तपशील प्रकल्प अहवाल (उझठ) प्रक्रियेत मोठी गती आली असून कामकाज सकारात्मक टप्प्यावर पोहोचल्याची अधिकृत माहिती समोर येत आहे.

या रेल्वे मार्गाचा सर्वाधिक फायदा नांदेड शहरालगतची मोठी वस्ती असलेल्या विष्णुपुरी,वडेपुरी, जानापुरी,बामणी,खरबी या गावांना होणार आहे. या भागातील नागरिक दळणवळण,रोजगार व व्यापाराच्या दृष्टीने नव्या युगात प्रवेश करणार असल्याची भावना व्यक्त करत आहेत.

विशेष म्हणजे,रत्नेश्वरी देवस्थान आता केंद्रीय विकासात्मक आराखड्याशी जोडले जाणार असल्याने वडेपुरी सर्कल परिसरात मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. भाविकांची वाढती वर्दळ,पर्यटनाचा विकास आणि स्थानिकांना मिळणाऱ्या नव्या संधी यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाची लहर निर्माण झाली आहे.

याबाबत बोलताना भाजपा चे मा. जिल्हा सचिव श्री. सदाशिव अंबुरे,समाजसेवक श्री.राजू पाटील येवले,तसेच श्री. प्रकाश पाटील दळवे,मा. सरपंच दामू पाटील,बालाजी शिंदे,तुकाराम पाटील बोडके,मोतीराम काळे व असंख्य कार्यकर्ते यांनी आनंद व्यक्त केला आहे व खासदार डॉ. अजित गोपछडे साहेबांचे आभार मानले आहे.

हा रेल्वे मार्ग म्हणजे नांदेड जिल्ह्यासाठी सुवर्णसंधी आहे. लोकांच्या अनेक दशकांच्या प्रतीक्षेला आता प्रत्यक्ष रूप मिळत आहे. केंद्र सरकारच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम वेगाने मार्गी लागेल आणि याचा सर्वाधिक लाभ सामान्य नागरिकांना मिळणार आहे

## योजनेच्या आडून पैसे घेणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई कधी होणार

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ८ डिसेंबर-**

तालुक्यातील मौ. चिंचगव्हाण येथील ग्रामसेवक नामदेव निर्मळ यांनी गोठ्याच्या योजनेखाली लाभार्थी ज्ञानेश्वर हुंबे यांची फसवणूक करून पंधरा हजार रुपयांची मागणी केली असता ती देऊन सुद्धा अद्यापही या योजनेचा लाभ तर दिलाच नाही अनेक तक्रारी अर्ज, आत्मदहनाचा इशारा देऊन सुद्धा अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई न झाल्याने या ग्रामसेवकास पाठिंबा कोणाचा असा प्रश्न पडला आहे. त्यामुळे लाभार्थी यांनी स्मरणपत्र देऊन गट विकास अधिकारी हदगाव यांच्याकडे या मुजोर व भ्रष्टाचारी ग्रामसेवकावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### लाभार्थ्यांचा संतप्त सवाल

मौ. चिंचगव्हाण येथील ग्रामसेवक नामदेव निर्मळ यांनी गोठ्याच्या लाभार्थी ज्ञानेश्वर हुंबे यांची फसवणूक करत १५००० रुपये रक्कम उकळले या व्यतिरिक्त घराची पट्टीची पूर्ण रक्कम दिल्यानंतर सुद्धा अद्यापि ही त्याची पावती दिली नाही असा आरोप देखील यावेळेस करण्यात आला याची वेळोवेळी लाभार्थी यांनी वरिष्ठांना तोंडी, लेखी तक्रार देऊन सुद्धा या मुजोर, भ्रष्टाचारी ग्रामसेवकाची पाठराखण का केली जात आहे या उपरही लाभार्थी यांनी आत्मदहनाचा इशारा देताच आपण समजूत काढून मला न्याय देण्याचा शब्द दिल्यामुळे मला आत्मदहनापासून प्रवृत्त केले होते पण अद्यापही मला न्याय भेटला नाही तरी गट विकास अधिकारी यांनी स्मरण पत्र देऊन या गंभीर समस्ये कडे लाभार्थी यांनी लक्ष वेधल

## घरकुल व पुनर्वसनासाठी जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. ८ डिसेंबर-**



ऑगस्ट महिन्यात झालेल्या ढगफुटीमुळे हसनाळ व रावणगाव या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवित-वित्तहानी झाली. अनेकांचे संसार उघड्यावर पडले असून अजूनही काही कुटुंबे तात्पुरत्या आश्रयावर विसंबून आहेत. या दुर्दैवी घटनेनंतर शासन, प्रशासन, व्यक्ती, सामाजिक संस्था आणि औद्योगिक क्षेत्राने पुढाकार घेऊन पूरग्रस्तांच्या मदतीसाठी तत्परता दाखवली आहे. सगरोळी (ता. बिलोली) येथील संस्थेनेही विविध घटकांच्या सहकार्याने मदतकार्य सुरू केले आहे. पूरग्रस्तांच्या तातडीच्या गरजांचा विचार करून अधिक प्रभावी मदत कार्यक्रम आखण्यासाठी शुक्रवार (दि.५) रोजी सगरोळी येथे संस्कृति संवर्धन मंडळाच्या संकुलात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यामध्ये घरकुल पुनर्बांधणी आणि कायमस्वरूपी पुनर्वसनाच्या उपाययोजनांवर सखोल चर्चा झाली.

पूरामुळे अनेक घरे पूर्णपणे कोसळली असून काही घरे राहण्यायोग्य राहिली नाहीत. त्यामुळे ज्यांची घरे अद्याप उभी राहू शकलेली नाहीत अशा कुटुंबांना सर्वांच्या सहकार्याने घर उपलब्ध करून देण्यासाठी बैठकीत एकमत झाले. यासाठी अशा कुटुंबांची सर्वंकष माहिती तातडीने संकलित करून जलद मदत उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला. जिल्हाधिकारी म्हणाले की, घरकुलांचे बांधकाम कमीत कमी खर्चात आणि शक्य त्या अल्पावधीत पूर्ण व्हावे, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती सर्व मदत आणि समन्वय दिला जाईल. मागणी केलेल्या कुटुंबांची अ, ब, क अशा गटांमध्ये प्राधान्यक्रमानुसार वर्गवारी करण्यात येणार असून एकल महिला आणि भूमिहीन कुटुंबांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. ही संपूर्ण मोहीम जिल्हा प्रशासन, संस्कृति संवर्धन मंडळ आणि मशाल संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार आहे. कामाची शास्त्रीय आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी एक समन्वय समिती गठित केली जाणार असून प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दर आठवड्याला ऑनलाइन बैठक आयोजित केली जाईल. बैठकीच्या सुरुवातीला 'मशाल' संस्थेचे कार्यकारी संचालक निलेश करकरे यांनी हसनाळ व रावणगाव येथील क्षेत्र भेटीच्या आधारे पूरस्थितीचे विश्लेषण, नुकसानीचे स्वरूप आणि पुढील शक्यता यावर सविस्तर सादरीकरण केले. या बैठकीस संस्थेचे चेअरमन प्रमोद देशमुख, जलतज्ञ डॉ. सुमंत पांडे, उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, उपजिल्हाधिकारी क्रांती डोंबे, मशाल संस्थेचे कार्यक्रम व्यवस्थापक गणेश शिंदे, संस्था कार्यकर्ते अभिजीत महाजन, वसंत रावणगांवकर, व्यंकट शिंदे तसेच हसनाळ व रावणगाव येथील राजू पाटील रावणगावकर, प्रदीप पाटील, शादुल पटेल, आनंदराव पाटील, शंकर पाटील, प्रल्हाद मादळे, पप्पू आप्पा हासनाळे, मशरू पटेल आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'मातीचे आरोग्य' जपा! उमरी तालुक्यात जागतिक मृदा दिनी नैसर्गिक शेतीचा एल्गार

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. ८ डिसेंबर-**

रासायनिक खतांच्या अतिवापराने क्षीण होत चाललेल्या जमिनीला 'जीवनदान' देण्यासाठी आणि तिच्या नैसर्गिक गुणवत्तेची जपवणूक करण्यासाठी, उमरी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने जागतिक मृदा दिन (World Soil Day) अत्यंत अभ्यासपूर्ण व विश्लेषणात्मक पद्धतीने साजरा करण्यात आला. मौजे बितनाळ (ता. उमरी) येथील मारोतराव उमाटे यांच्या फार्म हाऊसवर आयोजित या 'नैसर्गिक शेती आणि माती गुणवत्ता' मंथन कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### माती नमुना तपासणी हाच पहिला उपचार

तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिराशे यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वपूर्ण उपक्रम पार पडला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते मार्गदर्शन सत्र. प्रमुख मार्गदर्शक मंडळ कृषी अधिकारी रामराव लखमोड यांनी माती नमुना तपासणीच्या वैज्ञानिक महत्त्वावर जोर दिला. जोपर्यंत मातीचा नमुना तपासला जात नाही, तोपर्यंत आपल्या जमिनीचे नेमके 'आरोग्य' काय आहे, हे कळू शकत नाही, असे स्पष्ट करत त्यांनी रासायनिक खतांवरील परावलंबित्व त्वरित कमी करून शाश्वत व नैसर्गिक शेतीकडे वळण्याचा क्रांतिकारी सल्ला दिला.

### सेंद्रिय शेती हाच दीर्घकाळचा आधार

तंत्र अधिकारी किशन मनूरकर यांनी जागतिक मृदा दिनाचा उद्देश विशद केला आणि मृदेची गुणवत्ता दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रिय शेती कशी आवश्यक आहे, हे सप्रमाण सिद्ध केले. त्यांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतातून मातीचा नमुना कसा अचूकपणे घ्यायचा, याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. तसेच, कृषी क्षेत्रातील अद्ययावत माहिती व योजना मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी 'महाविस्तार प'चा वापर करण्याचे आवाहन केले.

यावेळी सहायक कृषी अधिकारी एनलोड यांनी रासायनिक शेतीच्या दीर्घकालीन दुष्परिणामांवर सखोल विश्लेषण सादर केले. रासायनिक घटकांमुळे मातीचे नैसर्गिक गुणधर्म कसे नष्ट होतात आणि जमिनीचा कस हळूहळू कमी होऊन ती नापीकतेकडे कशी झुकते, याविषयीची माहिती शेतकऱ्यांसाठी 'डोळे उघडणारी' ठरली. बितनाळच्या सरपंच श्रीमती उमाटे यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली.


कार्यक्रमाच्या उत्तरार्धात, उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या शेतीविषयक गुंतागुंतीच्या समस्या व शंका थेट कृषी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. कृषी विभागाच्या टीमने प्रत्येक प्रश्नाचे अचूक, तांत्रिक आणि विश्लेषणात्मक उत्तर देऊन शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान केले. सहायक कृषी अधिकारी मारोती कदम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर वरवंकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळ कृषी अधिकारी लखमोड, तंत्र अधिकारी मनूरकर, सहायक कृषी अधिकारी वरवंकर, गणेश शिंदे, विनोद एनलोड, देविदास उलगुलवाड, ओम गजेवाड, संतोष डोपलवार, मनोज सुर्यवंशी, मिथुन पाटील, पामलवाड, सोनकांबळे आदींनी परिश्रम घेतले.

## माळेगांव यात्रेतील स्पर्धकांना शांतीदूत प्रतिष्ठाणच्यावतीने सात लाखांचे बक्षिस

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ८ डिसेंबर-**

आशियाखंडात प्रसिध्द असलेल्या लोहा तालुक्यातील माळेगांव येथील खंडोबा यात्रेतील विविध स्पर्धकांना कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या शांतीदूत प्रतिष्ठाणच्यावतीने सात लाख रुपयांचे बक्षिस यंदापासून सुरु करण्यात येत असल्याची माहिती प्रतिष्ठाणचे अध्यक्ष जि.प.चे माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.

दक्षिण भारतातील प्रसिध्द असलेल्या माळेगांव यात्रेच्या वैभवात भर टाकण्याचा निर्णय कंधार येथील शांतीदूत प्रतिष्ठाणने घेतला आहे. माळेगांवची यात्रा जिल्हा परिषद प्रशासन व लोहा पंचायत समिती, माळेगांव ग्रामपंचायतच्यावतीने दरवर्षी आयोजित केली जाते. या यात्रेनिमित्त जि.प.प्रशानाच्यावतीने विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते. यात्रा निधीच्या कमरतेमुळे जिल्हा परिषदेच्यावतीने देण्यात येणाऱ्या बक्षिसांची रक्कम अतिशय तुटपुंजी आहे. यात्रेतील विविध स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना प्रोत्सहान देण्याचा निर्णय घेवून शांतीदूत प्रतिष्ठाणने मोलाचे एक पाऊल पुढे टाकून यात्रेच्या वैभवात भर टाकण्यासाठी सरसावले आहे. जिल्हा परिषदेच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या पशुसंवर्धन स्पर्धेतील चॅम्पियन



लाल कंधार नर व मादी गटातील विजेत्यांना शांतीदूत प्रतिष्ठाणच्यावतीने प्रत्येकी ३१ हजाराचे बक्षिस जाहिर करण्यात आले आहे. लालकंधारी मादी व नर या दोन्ही गटांना प्रत्येकी पहिले बक्षिस २१ हजार रुपये देण्यात येणार आहेत. चॅम्पियन देवणी नर व मादी या दोन्ही गटासाठी प्रत्येकी २१ हजार रुपयांचे बक्षिस ठेवण्यात आले आहे.

शंकरपट स्पर्धेतील विजेत्यांना पहिलं बक्षिस ५१ हजार, दुसरं बक्षिस ४१ हजार, तिसरं बक्षिस ३१ हजार, चौथं बक्षिस २१ हजार, पाचवं बक्षिस ११ हजार देण्यात येणार असून स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकांना प्रोत्सहानपर बक्षिस म्हणून प्रत्येकी १००१ रुपयेही देण्यात येणार असल्याचे प्रविण पाटील चिखलीकर यांनी सांगितले आहे.

माळेगांव यात्रेत दरवर्षी महाराष्ट्रातील नामवंत लोकनाट्या मंडळ सहभागी होत असतात त्यांना जिल्हा परिषदेच्यावतीने देण्यात येणाऱ्या बक्षिसांची रक्कम खूप अल्प असते. त्यासाठी शांतीदूत प्रतिष्ठाणने यंदा यात्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक लोकनाट्य मंडळास ११ हजार रुपयांचे बक्षिस देण्याचा निर्णय प्रतिष्ठाणने घेतला आहे. यात्रेतील लावणी महोत्सवात सहभागी होणाऱ्या प्रत्येक लावणी कलाकार संचास प्रतिष्ठणच्यावतीने प्रत्येकी ११ हजाराचे रोख बक्षिस देण्यात येणार असल्याची घोषणा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष माजी जि.प.सभापती प्रविण पाटील चिखलीकर यांनी केली आहे.

जिल्हा राष्ट्रवादीचे नेते तथा कंधार-लोहा विधानसभा मतदार संघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मतदारसंघात माळेगांवची यात्रा भरते. यात्रेतील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांचे प्रोत्साहन वाढवून यात्रेच्या वैभवात भर टाकण्यासाठी शांतीदूत प्रतिष्ठाणने हे रोख बक्षिस देण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्यावतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या व्यतीरिक्त स्पर्धेतील विजेत्यांना प्रतिष्ठाणच्यावतीने हे बक्षिस देण्यास येणार असल्याची माहिती प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रविण पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.